मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १९० ■ शुक्रवार, २० मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# पनवेल मध्ये गुढीपाडव्याची भव्य शोभायात्रा

## ‘वंदे मातरम्’ १५० वर्षे थीमने रंगला नववर्ष स्वागत सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल शहरात गुढीपाडव्याच्या निमित्ताने निघालेल्या भव्य शोभायात्रेत यंदा उत्साह, ऊर्जा आणि सांस्कृतिक वैभवाचा अक्षरशः महासागर उसळवला. मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत करत संपूर्ण शहर भगव्या रंगात न्हाऊन निघाले होते. नववर्ष स्वागत समिती पनवेल यांच्या वतीने आयोजित या शोभायात्रेने ‘भव्यतेचा नवा उच्चांक’ गाठला.







या दिमाखदार शोभायात्रेला शहरातील आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथून उत्साहात सुरुवात झाली. त्यानंतर ही मिरवणूक कर्मवीर भाऊराव पाटील चौक, टपाल नाका शनी मंदिर , महात्मा गांधी मार्ग, मिरची गल्ली, कापड बाजार, जय भारत नाका आणि लोकमान्य टिळक मार्ग या प्रमुख मार्गांवरून जल्लोषात मार्गक्रमण करत स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे भव्य समारोपास पोहोचली. टिळक रोड, यशोमंगल नाका आणि सावरकर चौक परिसरात नववर्ष स्वागत समिती पनवेल आणि श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या उभारलेली आकर्षक सजावट, रोषणाई आणि भगव्या पताकांनी सजलेले रस्ते पाहताना प्रत्येकाच्या डोळ्यांचे पारणे फिटत होते. ढोल-ताशांचा कडकडाट, लेझीमचा थरारक ताल, पारंपरिक वेशभूषेत सजलेले युवक-युवती आणि ‘जय भवानी, जय शिवाजी’च्या घोषणांनी वातावरण अक्षरशः दणाणून गेले.

यंदाच्या शोभायात्रेचे सर्वात मोठे आकर्षण ठरली ‘वंदे मातरम्’ या राष्ट्रगीताच्या १५० वर्षांच्या गौरवाची भव्य थीम. देशभक्तीने भारलेले चित्ररथ, जिवंत देखावे आणि प्रभावी सादरीकरणांनी उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. स्वातंत्र्य, संस्कृती आणि राष्ट्रीय अभिमान यांचा संगम या मिरवणुकीत ठळकपणे अनुभवायला मिळाला.

परिसरातील तब्बल १४ संस्थांचे भव्य आणि आकर्षक चित्ररथ या शोभायात्रेत सहभागी झाले होते. प्रत्येक चित्ररथाने आपल्या कलात्मकतेने आणि संदेशाने प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच युवानाद ट्रस्ट तर्फे ध्वज–लेझीम–ढोल पथकात सुमारे १५० मुलांनी सहभाग घेत पारंपरिक सादरीकरणाने वातावरण भारून टाकले.या दिमाखदार सोहळ्यात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा नेते प्रीतम म्हात्रे, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, महीला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, राजू सोनी, सुमित झुंजारराव, नगरसेविका रुचिता लोंढे, प्रीती जॉर्ज, शिवानी घरत, अभिषेक पटवर्धन, केदार भगत, अमित ओझे, रुपेश नागवेकर, माधुरी गोसावी यांच्यासह तसेच नगरसेवक आणि विविध पक्षांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.उत्साह, परंपरा, संस्कृती आणि देशभक्तीचा संगम साधणारी पनवेलची ही शोभायात्रा ‘भव्य, दिव्य आणि अविस्मरणीय’ ठरली आणि नववर्षाच्या स्वागताला या शोभायात्रेने खऱ्या अर्थाने ऐतिहासिक उंचीवर नेऊन ठेवले.

## शनिवारी पनवेलमध्ये ‘निष्पाप’ नाटकाचे विनामूल्य प्रयोग

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे एक विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत मुंबई मराठी पत्रकार संघ प्रस्तुत ‘निष्पाप’ या नाटकाचे विनामूल्य सादरीकरण करण्यात येणार आहेहा प्रयोग येत्या शनिवारी दिनांक २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडणार आहे. या निमित्ताने रसिकांना दर्जेदार नाट्यप्रयोग पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. चोवीस तास बातम्यांच्या जगात वावरणाऱ्या पत्रकारांच्या संवेदनशीलता आणि सर्जनशीलतेला रंगभूमीवर योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मुंबई मराठी पत्रकार संघाने पहिल्यांदाच ६४ व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवला असून पदार्पणातच दोन पुरस्कार पटकावण्याचा मान मिळवला आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण निर्मित या नाटकासाठी लेखक प्रा. दिलीप परदेशी यांचे प्रभावी लेखन आणि दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांचे कसदार दिग्दर्शन लाभले आहे. ‘निष्पाप’ हे नाटक पत्रकारांच्या अभिनयकौशल्याला नवी दिशा देणारे ठरत आहे. या नाटकात ज्येष्ठ पत्रकार देवदास मटाले आणि स्वाती घोसाळकर प्रमुख भूमिकेत आहेत. तसेच दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांच्यासह प्रशांत चिडे, रश्मी महांबरे, सिद्धेश शिगवण आणि सुरेश ठुकरुळ यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. हा नाट्यप्रयोग सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, पनवेल आणि परिसरातील नाट्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी केले.

## “अजित दादांच्या अपघातावर सरकार मौनात; बोलू दिले नाही” – रोहित पवारांचा गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी विधानसभेत अजित पवार यांच्या अपघात प्रकरणावर सरकारवर तीव्र टीका करत गंभीर आरोप केले आहेत. स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून या विषयावर बोलण्याचा प्रयत्न केला असता, आपल्याला एक मिनिटही बोलू दिले गेले नाही, असा आरोप त्यांनी केला.रोहित पवार म्हणाले की, “अजित दादांच्या अपघातावर चर्चा व्हावी म्हणून स्थगन प्रस्ताव दिला होता. मात्र तो 293 च्या प्रस्तावात समाविष्ट करून विषयाला बगल देण्यात आली. त्या मुद्द्यांमध्ये केवळ एक ओळ टाकून सरकारने या गंभीर प्रकरणावर चर्चा टाळण्याचा प्रयत्न केला.”ते पुढे म्हणाले की, अधिवेशनाचे केवळ तीन-चार दिवस उरले असून बुधवारी शेवटचा दिवस आहे. सोमवारी 293 अंतर्गत विविध प्रस्तावांवर चर्चा होणार असली, तरी त्यात अजित पवारांच्या अपघाताचा मुद्दा दुय्यम ठरवण्यात येत आहे.




“यावरून स्पष्ट होतं की सरकारला या विषयावर बोलायचंच नाही,” असा थेट आरोपही त्यांनी केला.रोहित पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधताना म्हटले की, “पूर्वी सत्तेत असताना ‘दादा आमचे मित्र आहेत’ असे म्हणणारे आज गप्प आहेत. आता दादांना न्याय मिळवून देण्यासाठी कुणाकडेच वेळ नाही.”तसेच अनेक आमदारांना या विषयावर बोलायचे असूनही, सत्ताधारी पक्ष आणि सभागृह अध्यक्ष त्यांना संधी देत नसल्याचा आरोप त्यांनी केला.यापुढे जात त्यांनी अत्यंत गंभीर आरोप करत म्हटले की, “सरकार चर्चा टाळत आहे याचा अर्थ सत्ताधाऱ्यांपैकीच कुणीतरी या अपघातात सहभागी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.”दरम्यान, या प्रकरणाच्या चौकशीसाठी Central Bureau of Investigation (CBI) कडे चौकशीची मागणी करत अजित पवार यांच्या पक्षाने स्मरणपत्र दिले असले, तरी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.या सर्व आरोपांमुळे अजित पवार यांच्या अपघात प्रकरणावरून राज्यातील राजकारण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## उरणच्या रणरागिणीचा राष्ट्रस्तरीय गौरव; अनू पाटील यांना मानाचा' सिंधुताई सपकाळ नारीशक्ती पुरस्कार' प्रदान!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** "प्रसिद्धी, संपत्ती आणि स्वार्थ यापेक्षा राष्ट्रप्रेम आणि निष्ठेचा कृतिशील संदेश समाजाला देणे, हाच खरा धर्म आहे," हा विचार कृतीत आणणाऱ्या उरणमधील मुळेखंड येथील ज्येष्ठ समाजसेविका सौ. अनु सुभाष पाटील यांना सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल 'सिंधुताई सपकाळ नारीशक्ती गौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

१५ मार्च रोजी कला साधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात हा गौरव करण्यात आला.

अनु पाटील यांचा प्रवास म्हणजे २००७ मध्ये BYF या संस्थेच्या माध्यमातून सुरू झाला. २०१४ पर्यंत



उरण परिसरातील महिला बचत गटांच्या समन्वयक म्हणून त्यांनी पायाभूत काम केले. त्यानंतर २०२० पासून 'आई माऊली ग्राम संघ' चाणजे आणि 'सागर किनारा प्रभाग' (उरण पश्चिम विभाग) अंतर्गत २५० महिला बचत गटांच्या अध्यक्षा म्हणून त्या कार्यरत आहेत. केवळ कागदोपत्री गट न चालवता, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी त्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या शासकीय योजना घराघरांत पोहोचवल्या आहेत. कला साधना संस्थेने अनु पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना विशेष नमूद केले की, देशाचे स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता आणि एकात्मता टिकवण्यासाठी त्या सातत्याने झटत आहेत. एक स्वावलंबी समाज घडवण्यासाठी त्यांनी केलेले सामाजिक कार्य हे खरोखरच 'निष्काम कर्मयोगाचा' उत्तम आदर्श आहे. महिलांना केवळ बचत गटा पुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या आरोग्यासाठी शिबिर आणि स्वयंरोजगारासाठी विविध उपक्रम राबवून त्यांनी महिलांच्या जीवनाला नवी दिशा दिली आहे. महिलांच्या अडीअडचणीत ढाल बनवून उभ्या राहणाऱ्या अनुताई पाटील यांच्या कार्याची दखल यापूर्वी महाराष्ट्र शासनाने अहिल्याबाई होळकर पुरस्कार देऊन घेतली आहे तसेच कलश इंटरटेनमेंट चा नारी सन्मान पुरस्कारही त्यांच्या खाती जमा आहे आता माईंच्या सिंधुताई सपकाळ यांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार त्यांच्या ध्येयनिष्ठ आणि प्रामाणिकपणाची पोचपावती ठरली आहे.

हा पुरस्कार स्वीकारताना अनु पाटील यांच्या डोळ्यात कृतज्ञ चे भाव होते "हा एक केवळ सन्मान नसून हजारो माता भगिनींनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास आहे, पुरस्कार मिळणे ही जबाबदारीची जाणीव आहे ,समाजातील शेवटच्या घटकातील महिलेच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी आणि तिला स्वाभिमानी आयुष्य जगण्याचे बळ देण्यासाठी त्या हे सेवेचे कार्य यापुढेही तितक्यात तन्मयतेने आणि मायेने अखंड चालू ठेवणार आहेत.

## नारी शक्ती पुरस्कार २०२६ ने दिपाली पारसकर यांच्या पत्रकारितेतील कार्याचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** जागतिक महिला दिनानिमित्त मानवी हक्क संरक्षण फेडरेशन व केंद्रीय लोकशाही पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात नारी शक्ती पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. या प्रसंगी पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दिपाली पारसकर यांना “नारीशक्ती पुरस्कार पत्रकारिता क्षेत्र ” या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान देण्यात आला. महिलांनी घर व कार्यालय या दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत समाजात आदर्श निर्माण केल्याबद्दल त्यांचे




कौतुक करण्यात आले. त्यांच्या कार्यामुळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळत असल्याचे आयोजकांनी नमूद केले. यावेळी मानवी हक्क संरक्षण फेडरेशनतर्फे दिपाली पारसकर यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या कार्याची दखल घेऊन समाजात सकारात्मक बदल घडविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या दिमाखदार सोहळ्याला पनवेलचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला रविशेठ पाटील, रविशेठ पाटील,निलेश भोईर,अमर ठाकूर,सुधीर पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रांत ठसा उमटवणाऱ्या १६ महिलांना मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये डॉ. मुनीर तांबोळी (राष्ट्रीय अध्यक्ष), विकास पाटील (जिल्हाध्यक्ष, रायगड) आणि अन्य पदाधिकारी यांचा समावेश होता.

# भट्टीचामाळ गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाणी योजनेचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी /अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यातील भोस्ते ग्रामपंचायत हद्दीतील भट्टीचामाळ या गावामध्ये गुढीपाडवा व मराठी नवीन वर्षाच्या शुभमुहूर्तावर जलजीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाणीपुरवठा व फिल्टरेशन प्लांट योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे गावाला आता शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या योजनेमुळे भट्टीचामाळ गावातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागणार असून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळणार आहे. त्यामुळे गावाच्या आरोग्यदृष्ट्याही मोठा सकारात्मक बदल होणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



सदर कार्यक्रमास दिपक कदम, दत्ता पावर, सागर मोहिते, सरपंच गणेश जावळेकर, संतोष रटाटे, श्रीकांत कदम, प्रवीण शिरकर, नरेश कदम, प्रदीप शिरकर, जितेंद्र करजकर, मनोज साळवी, सुभाष कदम, गणेश इवलेकर, राकेश आंजर्लेकर, दिपक कदम, प्रमोद पुसाळकर, प्रविन शिरकर, रोहित कदम, दिनानाथ शिरकर, राहुल कदम यांसह सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# द्रोणागिरी किल्ल्याचे सौंदर्य राखण्यासाठी ' द्रोणागिरी मॉर्निंग ट्रेकर्स ' च्या माध्यमातून एक चांगली सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**उमाकांत पानसरे/उरण प्रतिनिधी** : आज बुधवार मराठी नूतन वर्ष अर्थात गुढीपाडव्याच्या निमित्ताने दि 18 मार्च 2026 रोजी ' द्रोणागिरी किल्ला ' उरण येथे किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांकडून अस्ताव्यस्त फेकला जाणारा कचरा त्यातुन सुंदर किल्ल्या च सौंदर्ययाचे नियोजन करण्यासाठी साठी द्रोणागिरी मॉर्निंग ट्रेकर्स ग्रुप कडून एक बंदिस्त (फिक्स )अशी डास्टबिन बसवण्यात आली महाराष्ट्राला संत परंपरेचा वारसा लाभलेला आहे. त्यातच हरी गोवारी गुरुजी यांचे सुपुत्र राजेंद्र गोवारी यांनी या कचरापेटी ( डस्टबिन



) ची संकल्पना मांडली आणी सर्व *द्रोणागिरी ट्रॅकर्स* चे सभासद यांनी ती पूर्णतःवास नेली त्यात श्री. बाबू बंडा यांचा सिहांचा वाटा आहे खालून हजार बाराशे फूट वर उंचावर डोकयावर वाहून नेणे ही मेहनत त्याची आहे त्याला रमेश म्हात्रे, अभिजित ठाकूर, भूपेंद्र भोंबले अतिश पाटील,दिनेश पाटील उरण केमिस्ट असोसिएशन चे श्री.बाळू घाळवट सर यांचे उत्तम सहकार्य लाभले

घराच्या आसपास घाण पसरल्यास डेंगी, मलेरिया, चिकन गुनिया यासारखे आजार पसरतात तसेच डोक्यात घाण असल्यास जातीयवाद, प्रांतवाद, भाषावाद या सारखे भयंकर आजार होऊ शकतात असे आपल्या कीर्तनातून पटवून सांगणारे संत *गाडगे बाबा* यांचा आदर्श घेऊन हा उपक्रम राबवण्यात आला यावेळी नरेशजी रहाळकर, घनश्याम कडू, जितू पाटील ( गडकिल्ल्यांचे अभ्यासक ) सतीश गवई यांची प्रमुख उपास्थिती होती समाजातील विविध क्षेत्रातून त्यांच्या या समाजसेवेच्या कृतीला भरभरून प्रतिसाद मिळत आहे आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे या उपक्रमात अनेक नागरिकांनी इथून पुढे सहभागी होण्यासाठी इच्छा दर्शविली आहे.

# ओबीसी जनगणनेचा बिगुल लाखनी तालुक्यातून सरपंच संघटनेचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/लाखनी तालुका प्रतिनिधी** : ओबीसी जनगणनेच्या मागणीसाठी लाखनी तालुका सरपंच संघटना आक्रमक झाली असून, २२ मार्च रोजी भंडारा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार करण्यात आला. यासाठी १८ मार्च रोजी पंचायत समिती सभागृहात झालेल्या महत्त्वपूर्ण सभेत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला.

सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच संघटनेचे लाखनी

तालुका अध्यक्ष परसराम फेंडरकर होते. मंचावर सचिव रुपचंद निर्वान, कोषाध्यक्ष मनोहर बोरकर, प्रसिद्धी प्रमुख सूरज निखाडे तसेच ओबीसी संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रा. उमेश सिंगनजुडे उपस्थित होते. प्रा. सिंगनजुडे यांनी ओबीसी जनगणनेचे महत्त्व




पटवून देताना सांगितले की, "सरकारवर दबाव निर्माण करण्यासाठी २२ मार्चला भंडारा येथे जिल्हास्तरीय मोर्चा आणि २३ मार्चला दिल्ली येथे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या लढ्यात सरपंच संघटनेने सक्रिय सहभाग नोंदवणे गरजेचे आहे."

यावेळी लाखनी तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष फेंडरकर यांनीही संघटनेची भूमिका स्पष्ट करत सर्व सरपंचांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी प्रलंबित शिक्षक भरतीचा मुद्दाही ऐरणीवर आला. रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याने तात्काळ भरती करण्याची मागणी करण्यात आली. तसेच मनरेगा कामांतील तांत्रिक अडचणींवर चर्चा करण्यात आली. उपस्थित मनरेगा अधिकारी राहुल गिऱ्हेपुंजे यांनी सरपंचांच्या प्रश्नांचे जागीच निराकरण केले.

या सभेला तालुक्यातील सरपंचांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यामध्ये ललिता कोरे, आशा सिंगनजुडे, सुनीता कहालकर, ममता टिचकुले, इंदिरा बांडेबूचे, आचल फेंडर, उपेंद्र शेंडे, नरेश फुंडे, शामाजी बेदवार, खुमेश बोपचे, भारत कावळे, रामलाल पाटणकर, योगेश झलके यांच्यासह अनेक सरपंच बांधव व भगिनी उपस्थित होत्या.ओबीसी जनगणनेच्या मागणीसाठी लाखनी तालुक्यातून आता संघटित आवाज उठत असून, येणाऱ्या मोर्चात त्याचे मोठे रूप पाहायला मिळणार आहे.

# "सामंतांनी मंत्रिपदाला साजेसं काम करावं; भाजपमध्ये जाण्याची शक्यता"

## नाना पटोले यांचा हल्लाबोल, 'खरात प्रकरणावर'ही गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका/मुंबई** : नाना पटोले यांनी राज्य सरकार आणि मंत्री उदय सामंत यांच्यावर जोरदार टीका करत सध्याच्या परिस्थितीवर सरकारचे लक्ष नसल्याचा आरोप केला. राज्यातील प्रश्नांकडे दुर्लक्ष करून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचे त्यांनी स्पष्टपणे म्हटले.

पटोले म्हणाले की, उदय सामंत यांनी आपल्या खात्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. "राज्यात अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, मात्र त्यावर उपाययोजना करण्याऐवजी जनतेची दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे," असा आरोप त्यांनी केला. तसेच सामंतांचा पक्ष भाजपच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा टोला लगावत, "ते मंत्री आहेत, त्यांनी मंत्र्यांसारखे काम करायला हवे," असेही त्यांनी सुनावले.

यावेळी त्यांनी राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आणणारा दावा करत म्हटले की, "खरं तर उदय सामंत हे भाजपमध्ये जाण्याच्या तयारीत आहेत," अशीही शक्यता त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, 'कॅप्टन अशोक खरात' प्रकरणावर बोलताना पटोले यांनी गंभीर आरोप करत खळबळ उडवून दिली. "खरात महाराज हे राजकीय महाराज म्हणून वागत होते. अनेक मोठे राजकीय नेते त्यांच्या सानिध्यात होते. काही नेते आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा व सदस्य देखील त्यांच्याशी संबंधित असल्याचे दिसून येते," असे त्यांनी सांगितले.पटोले यांनी पुढे म्हटले की, "हे संपूर्ण प्रकरण अत्यंत भयानक आहे. एक रेपिस्ट महाराज राजकीय आश्रयाखाली वाढत गेले," असा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच, या प्रकरणात सरकार आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न करू शकते, अशी शंका व्यक्त करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला."आमच्याकडे अनेक व्हिडिओ आणि पुरावे आले आहेत. मोठ्या नेत्यांचे फोटो, पूजा आणि इतर बाबींचे दस्तऐवज आमच्याकडे आहेत. सरकारने यावर तात्काळ कारवाई केली नाही, तर आम्ही त्यांना धारेवर धरू," असा इशाराही पटोले यांनी दिला.या वक्तव्यामुळे राज्यातील राजकारण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत असून, सरकार यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अजिंठा लेणी परिसरात निसर्गाचे 'पिवळे सोने' बहरले!

## दुर्मिळ 'सोनसावर' वृक्षाची वनविभागाकडून अधिकृत नोंद

**दैनिक युवक आधार**


**योगेश पालोदकर /सिल्लोड:-** जागतिक वारसा लाभलेल्या अजिंठा लेणी परिसरातील जैवविविधतेत एका दुर्मिळ नैसर्गिक ठेव्याची भर पडली आहे. वाघूर नदीच्या काठी निसर्गातील 'पिवळे सोने' मानला जाणारा 'सोनसावर' (शास्त्रीय नाव: कोक्लोस्पर्मम रिलिजिओसम) हा वृक्ष वनाभ्यास दौऱ्यात आढळून आला आहे. सिल्लोड येथील पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील आणि अजिंठा वनपरीक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांनी या वृक्षाचा शोध लावला असून, वनविभागाच्या 'बीट पुस्तिका' व 'वर्किंग प्लॅन बुक'मध्ये याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे.


**सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा**

बौद्ध धर्म: २६ बोधी वृक्षांपैकी एक महत्त्वाचा वृक्ष. १९ वे बुद्ध 'सिद्धत्थ' यांनी याच वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती केल्याचा संदर्भ 'बुद्धवंश' ग्रंथात आढळतो. थेरवाद दर्शनात याला 'किनीहीरिया' असे नाव आहे.

हिंदू धर्म: या वृक्षाची पिवळी धम्मक फुले भगवान महादेवाला अत्यंत प्रिय मानली जातात आणि ती अर्पण करण्याची प्राचीन परंपरा आहे.

अजिंठा लेणी: लेणीतील जगप्रसिद्ध भित्तीचित्रांमध्ये जो नैसर्गिक 'पिवळा रंग' वापरला





आहे , तो तयार करण्यासाठी याच सोनसावर फुलांचा उपयोग केल्याचे मानले जाते.

डॉ. संतोष पाटील यांच्या मते, हा वृक्ष पर्यावरणासाठी अत्यंत उपकारक आहे. 'चेस्टनट स्ट्रीक सेलर' (खलाशी) जातीचे फुलपाखरू या झाडाच्या पानांवर आपली उपजीविका करते. तसेच, याच्या बोंडातील मऊ कापसाचा उपयोग अनेक पक्षी आपली घरटी बांधण्यासाठी 'कुशन' म्हणून करतात. प्राचीन काळी शांत झोप येण्यासाठी या कापसाचा उपयोग उश्यांमध्ये केला जात असे.

अजिंठा वनपरीक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांनी या वृक्षाच्या बियांपासून रोपवाटिका विकसित करून लेणी परिसरात मोठ्या प्रमाणावर लागवड करण्याचा संकल्प जाहीर केला आहे. यामुळे लेणीच्या नैसर्गिक सौंदर्यात भर पडणार असून, या दुर्मिळ प्रजातीचे जतन होण्यास मदत होईल.

# आ.अब्दुल सत्तार यांचा दमदार निर्णय; बहिरोबा महाराज मंदिर रस्त्याच्या कामाला वेग..खोट्या आरोपांना पूर्णविराम!

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : सोयगाव येथील प्रसिद्ध बहिरोबा महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली असून, सदर काम बहिरोबा महाराज यात्रेपूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित विभागाला दिले आहेत.त्यानुसार आज या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.गेल्या काही काळात या रस्त्याच्या कामावरून काही राजकीय व्यक्तींनी आरोप-प्रत्यारोप करत वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला होता.काहींनी खोटे आरोप करत स्थानिक प्रशासनावर टीका केली होती.मात्र या सर्व गोष्टींची दखल घेत कार्यसम्राट आमदार अब्दुल सत्तार यांनी थेट हस्तक्षेप करून कामाला गती दिली आहे. याप्रसंगी कामाचा शुभारंभ शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबासाहेब) काळे,यांच्या प्रमुख उपस्थितीत तर समाजसेवक शिवसैनिक किशोर मामा मापारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहरप्रमुख संतोष बोडखे,

न.प.तील शिवसेना गटनेता अक्षय काळे,राजू दुतोंडे,कदीर शहा,हर्षल



काळे,दीपक पगारे,भगवान जोहरे,गजानन कुडके,बबलु हाजी,सोसायटीचे संचालक रमेश गव्हांडे,युट्यूब चॅनेल प्रदीप चौधरी, प्रतिष्ठित व्यापारी अमोल मापारी,

समाधान अण्णा काळे,अतुल परदेशी,अक्षय बापू काळे,पंकज देशमुख,दिपक चौधरी,नाना सोनवणे,हरिसिंग परदेशी,आदी मान्यवर उपस्थित होते.दरम्यान,यापूर्वी या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे भाविकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत होता. खड्डे,उखडलेला रस्ता आणि अपुरी सुविधा यामुळे नागरिक त्रस्त झाले होते.याबाबत स्थानिक नागरिक आणि भाविकांकडून वारंवार तक्रारी देखील करण्यात येत होत्या.

या सर्व बाबींची गंभीर दखल घेत कार्यसम्राट आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांना स्पष्ट सूचना देत काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.तसेच,श्रद्धास्थान असलेल्या भैरवनाथ महाराजांच्या जत्रेपूर्वी हा रस्ता पूर्ण व्हावा,जेणेकरून भाविक भक्तांना कोणताही त्रास होणार नाही,याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.आता या कामाला वेग आला असून,युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले आहे.यात्रेपूर्वी रस्ता पूर्ण होणार असल्यामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण असून,स्थानिक नागरिकांनी देखील या निर्णयाचे स्वागत केले आहे.

**शिवसेना जिल्हाप्रमुख आबासाहेब काळे यांची प्रतिक्रिया:**

"श्री बहिरोबा महाराज मंदिराकडे जाणारा रस्ता हा भाविकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.अनेक दिवसांपासून या रस्त्याच्या कामात अडथळे येत होते व काही जणांनी या विषयावर अनावश्यक राजकारण करण्याचा प्रयत्न केला. मात्र आमदार अब्दुल सत्तार साहेब यांनी ठाम भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना कडक निर्देश दिले आणि आज कामाला प्रत्यक्ष गती मिळाली आहे.यात्रेपूर्वी हा रस्ता पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत.भाविकांना कोणताही त्रास होऊ नये,हीच आमची प्राथमिकता आहे. स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने हे काम निश्चित वेळेत पूर्ण होईल,असा मला विश्वास आहे."

# सोयगावात पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व रुद्रयाग सोहळ्याचे दि.२४ मार्च ते दि.२७ भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : परिसरात प्रथमच श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक रुद्रयाग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.असून हा धार्मिक सोहळा दि.२४ मार्च ते २७ मार्च २०२६ दरम्यान यज्ञाचे मुख्य पुरोहित पंडित आनंता यशवंत मोरे असुन प्रमुख उपस्थिती महामंडलेश्वर प.पु.दयानंदजी महाराज,शेलगांव व प.पु.ओकारगिरी महाराज गुरु काशिगिरी महाराज,मुर्डेश्वर ठिकाण :- संत ज्ञानेश्वरमहाविद्यालय,सोयगाव येथे संपन्न होणार आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे



आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध धार्मिक विधी,पूजा, हवन तसेच दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दि.२४ मार्च रोजी सकाळी ८ वाजता मूर्तीची नगर प्रदक्षिणा व शोभायात्रा काढण्यात येणार असून सायंकाळी प्रायश्चित्त संकल्प, गोपुजन व विष्णुपुजन होईल. दि.२५ मार्च रोजी गणेश पूजन,पुण्याहवाचन,मातृका पूजन,कुंडपूजन व सर्व देवतांची स्थापना तसेच मूर्तीचा जलाधिवास होणार आहे.दि.२६ मार्च रोजी प्रांतपूजन,हवन,न्यास स्थापना,धान्याधिवास व शय्यानिवास हे विधी पार पडतील.तर दि. २७ मार्च रोजी प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण,पूर्णाहुती, आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. महाप्रसादाची वेळ दुपारी १२ वाजता ठेवण्यात आली आहे.या सोहळ्यात ह.भ.प.विक्रम महाराज झाल्टे (पिंप्राळा), ह.भ.प.अजबराव महाराज (सिल्लोड),ह.भ.प.लखन महाराज पाटील (चिंचखेडा, ता.जामनेर) व ह.भ.प.राजेंद्र महाराज साबळे संत गजानन महाराज यांचे वंशज थळ,यांचे कीर्तन व प्रवचन होणार आहे.कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री महामुनी अगस्ती महाराज वारकरी शिक्षण संस्था, सोयगाव तालुका वारकरी मंडळ,श्रीराम भजनी मंडळ तसेच विविध धार्मिक व सामाजिक संस्थांचे सहकार्य लाभत आहे.समस्त ग्रामस्थ मंडळी,सोयगाव ,काळेनगर, आमखेडा व पंचक्रोशीतील भाविकांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

# गुड शेफर्ड स्कुल व द सिनियर सिटीझन मँगो गार्डन यांचा महिला दिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**बेलापूर / प्रतिनिधी** :गुड शेफर्ड स्कूल बेलापूर आणि द सीनियर सिटीजन मँगो गार्डन यांच्या संयुक्त विद्यमाने १७ मार्च २०२६ रोजी महिला दिन ग्रँड ५१ हॉटेल येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे श्री सुरेश पोटे फेस्कॉम मुंबई अध्यक्ष आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. लता प्रकाश पोवार तसेच डॉ.रेखा भातखंडे उपाध्यक्ष व उज्ज्वल पाठारे यांच्या हस्ते दीप




प्रज्वलन करून करण्यात आला. महिला शिक्षक वर्गाने सांस्कृतिक कार्यक्रम केले तर सिनिअर सिटीजन मधील सदस्यांनी गायन सादर केले. फेस्कॉम अध्यक्ष सुरेश पोटे यांनी शिक्षक व ज्येष्ठ नागरिक यांचे कौतुक केले. भोजनाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# गोदाकाठच्या गावांना जोडण्यासाठी गोदावरी परिक्रमा मार्ग करावा: रौंदळे

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ महाराष्ट्राच्या बहुतांश भागांना वरदान असलेल्या गोदावरी नदीच्या उगमापासून ते संगमापर्यंत दोन्ही बाजूंनी गोदावरी परीक्रामा मार्ग मंजूर करण्यात यावा संपूर्ण गोदाकाठच्या गावांना असलेल्या रस्त्याच्या प्रश्नांची सोडवणूक तर या निमित्ताने होईलच पण सर्वात महत्त्वाचे तिर्थक्षेत्रे या निमित्ताने एकमेकांशी जोडली जातील याकडे ऑल इंडिया धनगर महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रामकिसन रौंदळे यांनी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन संसद भवनात निवेदन दिले गोदावरी परिक्रमा हा महाराष्ट्रातील बहुसंख्य जनतेच्या अस्थेचा विषय आहे नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथून गोदावरी नदीचा प्रवास सुरू होतो आणि आंध्र प्रदेशापर्यंत जातो सुमारे १४६५ किलोमीटर लांबीच्या या प्रवासात त्र्यंबकेश्वर पैठण परभणी जिल्ह्यातील मुदगलेश्वर गंगाखेड नांदेड यासारखी महत्त्वाची तिर्थक्षेत्र जोडली आहेत आपण ज्याला गोदा प्रदक्षिणा असे ही म्हणतात मात्र गोदाकाठच्या भागातील रस्त्यांची दुरवस्था प्रचंड असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होऊ लागली आहे तसेच गोदाकाठच्या गावांमध्ये दळणवळणाची साधने फारशी नाहीत या पाश्र्वभूमीवर जर गोदावरी परिक्रमा असा मार्ग तयार झाला तर भाविकांस शेतकरी व सर्व घटकांची सोय होणार आहे या मार्गाला मंजुरी द्यावी अशी मागणी ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रामकिसन रौंदळे यांनी गडकरी यांना भेटून एका निवेदनाद्वारे केली आहे

# स्वर्गीय रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालय देवळी विद्यालयाला 'उत्कृष्ट शाळा'चा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे (पश्चीम विदर्भ)/महागाव (यवतमाळ)** : स्व. रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालय, देवळी या शाळेला दिनांक १७ मार्च २०२६ रोजी 'दिशा इम्प्लिमेंटेशन स्कूल' अंतर्गत उत्कृष्ट शाळा म्हणून गौरविण्यात आले. हा सन्मान शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

जिल्हा परिषद वर्धाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. पराग सोमन यांच्या हस्ते तसेच जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मा. श्रीमती प्रतिभा भागवतकर व सहाय्यक सल्लागार मा. श्रीमती सोनाली शिंदे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार शाळेचे शाळा प्रमुख जीवन टाले व विशेष शिक्षक ज्ञानेश्वर काळे यांना प्रदान करण्यात आला.



यावेळी दिशा नागपूर विभागाच्या समन्वयक मा. श्रीमती रोशनी गोड व श्री. अभय रोठे यांचीही विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात शाळेच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली असून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले.या सन्मानामुळे शाळेच्या शिक्षकवर्ग व कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, भविष्यातही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# चिमण्यांसाठी पाण्याच्या बाटल्यांतून साकारले आकर्षक फिड

## 'वैनतेय' कब-बुलबुल पथकाचा चिमणी संवर्धनाचा संदेश; 'जागतिक चिमणी दिन विशेष'

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : कधी काळी आपल्या चिवचिवाटाने माणसाचं भावविश्व समृद्ध करणा-या चिमण्यांची घटती संख्या ही पर्यावरणासाठी धोक्याची घंटा असून, वाढते शहरीकरण, सिमेंटची घरे, मोबाईल टॉवर मधून निघणा-या घातक लहरी, पिकावर किटकनाशकांचा होणारा अतिवापर, बेसुमार वृक्षतोड यामुळे चिमणीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. निसर्ग साखळीतील चिमणीचे महत्वाचे स्थान अधोरेखीत करीत जागतिक चिमणी दिनाचे निमित्ताने निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील कब-बुलबुल पथकातील विद्यार्थ्यांनी चिमण्यांसाठी आकर्षक फिडर तयार करून 'चिमणी वाचवा पर्यावरण वाचवा' संदेश दिला.

शाळेतील स्काऊट शिक्षक गोरख सानप यांनी पाण्याच्या वाया गेलेल्या रिकाम्या बाटल्या, जुन्या बरण्या, आईस्क्रीम व श्रीखंडाचे रिकामे डबे, तार, दोरी, रंगीत टेप यांचा वापर करून विद्यार्थ्यांकडून चिमण्यांना दाणे व पाणी ठेवण्यासाठी आकर्षक ३३१ फिडर तयार करून घेतले. शाळेच्या आवारातील झाडांवर तसेच घरातील बाल्कनी, खिडकीत, गच्चीवर फिडर ठेवून त्यात चिमण्यांसाठी दाणा-पाण्याची सोय करण्याचा संकल्प कब-बुलबुल पथकातील विद्यार्थ्यांनी केला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना चिमण्यांची मनोरंजक माहिती देण्यात आली.



**निफाड : जागतिक चिमणी दिनानिमित्त पाण्याच्या बाटल्या,बरण्या यांचा वापर करून वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर निफाड शाळेतील कब - बुलबुल पथकातील विद्यार्थ्यांनी तयार केलेले फिडर समवेत शिक्षक वृंद.**

'स्काऊट' हा प्राणीमात्रांचा मित्र असतो हा नियम केवळ पाठांतर न करता प्रत्यक्ष आचरणात आणून आपल्या आवडत्या चिऊताईची माहिती जाणून घेत त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याची प्रेरणा तसेच समाजप्रबोधन व जनजागृती साठी चिमुकल्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे न्यायमुर्ती रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड दिलीप वाघावकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे निफाड पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी एल. के. भरसट, कैलास बोरसे, वसंत गायकवाड,केंद्रप्रमुख अनिता अहिरे मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व पालकांनी कौतुक केले.

चिमणी वाचवण्यासाठी हे नक्कीच करता येईल..

चिमण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी बाल्कनीत, गच्चीवर अथवा अंगणात मातीच्या पसरट भांड्यात पाणी ठेवूया. चिमण्यांना लागणारे धान्य भांड्यात अथवा फिडर मधे झाडावर, बाल्कनीत ठेवूया.लाकडाचे, पुठ्ठ्याचे कृत्रिम घरटे तयार करून विविध ठिकाणी ठेवूया..किटकनाशकांचा अतिवापर टाळूया.. चिमण्या वाचवणे म्हणजे आपले पर्यावरण वाचवणे होय. चिमण्यांचा चिवचिवाट पुन्हा अंगणात आणण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**"पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी निसर्गातील प्रत्येक घटकाला जपणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष कृतीतून टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करून चिमण्यांच्या दाणा-पाण्याची सोय करून चिमणी संवर्धणासाठी चिमुकल्यांनी राबविलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. आपण सर्वांनी चिमणी वाचवण्याच्या या मोहिमेत सहभागी होऊन पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे."**

**- वि. दा. व्यवहारे, अध्यक्ष न्यायमुर्ती रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड**

# सणसर येथे पार्थ बाबा निंबाळकर यांच्या पुढाकाराने इफ्तार पार्टी

## सामाजिक सलोखा व एकतेचा सुंदर संदेश

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने सणसर ता.इंदापूर येथे पार्थ बाबा निंबाळकर यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले.हा उपक्रम एकतेचा, बंधुभावाचा आणि सामाजिक सलोख्याचा सुंदर संदेश देणारा ठरला.सर्व धर्मीय बांधव एकत्र येऊन प्रेम,आदर आणि शांततेची भावना दृढ करत आहेत, हीच खरी आपल्या संस्कृतीची ओळख असल्याचे मत मुस्लिम बांधवाकडून व्यक्त करण्यात आले.

मा.पार्थ बाबा निंबाळकर यांचे हे आयोजन समाजाला एकत्र आणणारे आणि मानवतेचा संदेश देणारे प्रेरणादायी पाऊल ठरले.कै.पै. दत्तात्रय निंबाळकर यांच्यापासून चालत आलेली परंपरा पुढे नेत सामाजिक कार्याचे पाऊल टाकल्याबद्दल समस्त मुस्लिम जमात सणसर यांच्या वतीने पार्थ बाबा निंबाळकर यांचे आभार मानण्यात आले यावेळी



विजयसिंह निंबाळकर संजयभैय्या निंबाळकर डॉ.दिपक निंबाळकर विजय पाटील हेमंत निंबाळकर सागर भोईटे वसंतराव जगताप पिंटू गुप्ते विजय शिरसट शंभूराजे निंबाळकर हरी मोहिते विशाल गुप्ते सूरज घाडगे रोहित निंबाळकर शुभम निंबाळकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

या इफ्तार पार्टीस मुस्लिम बांधव मोठया संख्येने माजी ग्रामपंचायत सदस्य अजित भाई तांबोळी, सणसर सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन शब्बीर भाई काझी,तसेच उमर भाई सय्यद, मुबारक कासम सय्यद, जकीरभाई सय्यद, मुस्तफा भाई सय्यद, वसीमभाई सय्यद, हनिफभाई तांबोळी, सिकंदरभाई शेख, इन्नूसभाई सय्यद, आरिफभाई तांबोळी, अजरुद्दीनभाई सय्यद, समीर पठाण, शाहरुख भाई कबीर, अरबाज भाई सय्यद, अय्याज भाई काझी, शाहरुख भाई सय्यद, कैफभाई तांबोळी, वसीम भाई शेख,फिरोज भाई पठाण, करीम भाई पठाण आदी मुस्लिम बांधव उपस्थित होते.यावेळी सामाजिक संदेश देत शब्बीर काझी यांनी या इफ्तार पार्टीतून धार्मिक सौहार्द, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला गेला.उपस्थित मुस्लिम बांधवांनी पार्थ बाबा निंबाळकर यांचे कौतुक करताना सांगितले की,"अशा उपक्रमांमुळे गावात एकोपा वाढतो, समाजात सलोखा टिकतो आणि खरी मानवतेची भावना दृढ होते."

# अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांचा ढीग; तातडीने कार्यवाही करा"

## आमदार गजानन लवटे यांची विधानसभेत जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जिल्हा अमरावती,दर्यापूर तालुक्यातील शिवसेना ठाकरे गटाचे आमदार गजानन लवटे यांनी अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांच्या प्रलंबित प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले. सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत गेल्या सात वर्षांत मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित राहिल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी सभागृहात उपस्थित केला.

आमदार लवटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०१९ ते २०२६ या कालावधीत महाविद्यालयीन स्तरावरील सुमारे ४ हजार १४ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज अद्याप प्रलंबित आहेत. महाविद्यालयांच्या स्तरावर होणाऱ्या दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांना




आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"शिष्यवृत्ती ही विद्यार्थ्यांसाठी केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या शिक्षणाचा आधारस्तंभ आहे. मात्र, अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने आणि प्रशासनाकडून तत्पर कार्यवाही न झाल्याने विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत आहे," असे ठाम मत आमदार लवटे यांनी व्यक्त केले.

यासोबतच त्यांनी राज्य शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन प्रलंबित अर्जांची तातडीने छाननी करून मंजुरी द्यावी, तसेच संबंधित महाविद्यालये आणि अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी केली. शिष्यवृत्ती वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणि गती आणण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचीही गरज त्यांनी अधोरेखित केली.दरम्यान, या मुद्द्यामुळे सभागृहात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा चर्चा रंगली असून, सामाजिक न्याय विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राज्य सरकार यावर काय भूमिका घेते आणि विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवरही भारताचा सागरी व्यापार स्थिर: केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी /प्रदीप पाटील** : केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्गमंत्री श्री. सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवार, दि. 19 मार्च 2026 रोजी बंदर व सागरी क्षेत्रातील हितधारकांसोबत आढावा व सल्लामसलत बैठक घेतली. जागतिक जहाज वाहतुकीच्या बदलत्या स्वरूपानुसार धोरणात्मक अनुकूलन साधण्यावर बैठकीत विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.या बैठकीत शिपिंग कंपन्या, टर्मिनल ऑपरेटर आणि व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी एकत्र आले होते, जेणेकरून जहाजांचे मार्ग, जहाजांचे वेळापत्रक आणि मालवाहतुकीतील संभाव्य व्यत्ययांसारख्या उदयोन्मुख आव्हानांवर विचारविनिमय करता येईल. कामकाजातील सातत्य सुनिश्चित करणे, विलंब कमी करणे आणि पुरवठा साखळीची लवचिकता टिकवून ठेवणे यावर चर्चा केंद्रित होती.

यावेळी हितधारकांनी प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती दिली आणि बदलत्या परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी, विशेषतः मध्य पूर्वेकडील ठिकाणांहून होणाऱ्या निर्यात-आयात मालवाहतुकीच्या संदर्भात, राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांवर प्रकाश



टाकला.यावेळी मार्गदर्शन करताना मा. केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्गमंत्री श्री. सर्बानंद सोनोवाल म्हणाले, की "मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारत सरकार तसेच बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाने मध्यपूर्वेतील बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या सागरी व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी तात्काळ व समन्वित पावले उचलली आहेत. वळवीण्यात आलेल्या जहाजांचे पश्चिम किनाऱ्यावर कार्यक्षम हाताळणी, आंतरराष्ट्रीय जहाज कर्मचाऱ्यांना दिलेली मानवीय मदत, तसेच जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणासारख्या प्रमुख बंदरांवर राबविण्यात आलेल्या सक्रिय व्यापार सुलभीकरण उपाययोजनांद्वारे आपल्या बंदरांनी उद्भवणाऱ्या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्याची क्षमता प्रदर्शित केली आहे."

ते पुढे म्हणाले, "आम्ही सर्व हितधारकांशी सातत्याने समन्वय राखत आहोत, ज्यामुळे प्रत्यक्ष वेळेत देखरेख, मालवाहतुकीची अखंडित हालचाल आणि पुरवठा साखळीतील कमीत कमी अडथळे सुनिश्चित होत आहेत. जागतिक अनिश्चिततेला समर्थपणे सामोरे जात, भारताचा सागरी क्षेत्र सक्षम, प्रतिसादक्षम आणि पूर्णतः सज्ज राहून देशाच्या आर्थिक गतीला बळकटी देत आहे." मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवरही भारताचा सागरी व्यापार स्थिर व लवचिक असल्याचा विश्वास भारताने जागतिक बाजारपेठेला दिला आहे. सक्षम पायाभूत सुविधा आणि समन्वित प्रयत्नांच्या बळावर देशातील बंदरे कार्यक्षमतेने कार्यरत असून, बदलत्या जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारत एक विश्वासार्ह व्यापार भागीदार म्हणून स्वतःची भूमिका अधिक दृढ करत आहे. प्रसंगी उपस्थित जेएनपीए अध्यक्ष, श्री. गौरव दयाल, (भा. प्र. से.,), तसेच जेएनपीए उपाध्यक्ष, श्री. रवीश कुमार सिंह,( भा. रे.सेवा.) यांनी मागील 20 दिवसांत जेएनपीएतर्फे राबविण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेत त्यांच्या परिणामकारकतेवर प्रकाश टाकला.यावेळी मध्यपूर्वेतील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या व्यापारातील अडथळयांच्या पार्श्वभूमीवर समन्वय व संवाद सुलभ करण्यासाठी जेएनपीए बंदराने सर्वप्रथम संयुक्त महासंचालक (डीजीएफटी), अतिरिक्त आयुक्त सीमाशुल्क, मुख्य महाव्यवस्थापक (वाहतूक) जेएनपीए आणि उप सागरी सल्लागार यांचा समावेश असलेली एक विशेष कार्यदल (टास्क फोर्स) स्थापन केला असल्याचे सांगण्यात आले.

जेएनपीएने विविध सुलभीकरणात्मक उपाययोजना राबविल्या असून, त्यामध्ये मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या मालासाठी तात्पुरती ट्रान्सशिपमेंट साठवण सुविधा; आवश्यकतेनुसार टर्मिनल्समध्ये अतिरिक्त साठवण जागेचे वाटप; तसेच मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या मालाच्या वहनासाठी तात्पुरत्या (ॲड-हॉक) जहाज कॉल्सची सोय करण्यात आली आहे. या अंतर्गत होर्मुझ सामुद्रधुनीच्या पूर्वेकडील फुजैराह आणि खोर फक्कन (यूएई) तसेच सोहार, मस्कत आणि सलालाह (ओमान) या बंदरांकडे माल वाहतुकीस प्राधान्य देण्यात आले आहे. याशिवाय, नाशवंत माल आणि मध्यपूर्वेतून परतणाऱ्या निर्यात मालाच्या जलद हाताळणीसही प्राधान्य देण्यात आले आहे. जेएनसीएच येथील सीमाशुल्क प्राधिकरणांनी एक महत्त्वपूर्ण सुलभीकरणात्मक उपाययोजना अमलात आणली असून, एक्सपोर्ट जनरल मॅनिफेस्ट (ईजीएम) दाखल न झालेल्या प्रकरणांतही निर्यात मालाच्या 'बॅक टू टाऊन' (बीटीटी) हालचालीस परवानगी देण्यात येत आहे. कंटेनर सील अखंड असल्यास प्राथमिक पडताळणीनंतर परवानगी दिली जाईल.

त्याच प्रमाणे सीपीपीमधील कंटेनर्ससाठी केवळ ई-सील पडताळणी आवश्यक आहे, तर कंटेनर फ्रेट स्टेशन्समधील कंटेनर्ससाठी शिपिंग बिलशी संलग्न मर्यादित तपासणी केली जाते. नेहमीची सविस्तर भौतिक तपासणी माफ करण्यात आली असून, बीटीटी संदर्भातील कोणतेही शुल्क किंवा दंडही माफ करण्यात आले आहेत.याची महिती देण्यात आली.याशिवाय, पात्र कंटेनर्ससाठी (28 फेब्रुवारी ते 14 मार्च) 15 दिवसांपर्यंत ग्राउंड रेंट/राहण्याचा वेळ शुल्कावर 100% सवलत देण्यात आली आहे. तसेच नाशवंत माल वाहून नेणाऱ्या अडकलेल्या रीफर कंटेनर्ससाठी रीफर प्लग-इन शुल्कावर 80% सवलत देण्यात आली आहे.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाकडे सध्या पुरेशी साठवण क्षमता उपलब्ध असून, बंदरातील कंटेनर साठवण जागेपैकी केवळ सुमारे 50% क्षमतेचा वापर सध्या होत आहे. मागील 20 दिवसांत बंदरातून सुमारे 16,000 टीईयू कंटेनर्स मध्यपूर्वेतील गंतव्यांकडे पाठविण्यात आले असून, सुमारे 1,700 टीईयू बीटीट परत आणण्यात आले आहेत. या कालावधीत अँकरजवरील जहाजांची संख्या 9 वरून 4 पर्यंत लक्षणीयरीत्या घटली असून, यामुळे जहाज क्लिअरन्स आणि कार्यक्षमतेत सुधारणा झाल्याचे दिसून येते. 18 मार्चपर्यंत बंदरावर तात्पुरत्या साठवणुकीसाठी उतरविण्यात आलेल्या ट्रान्सशिपमेंट कंटेनर्सची संख्या सुमारे 25,000 टीईयू आहे. तसेच, 1 मार्च रोजी सुमारे 5000 टीईयू इतकी असलेली अडकलेल्या कंटेनर्सची संख्या कमी होऊन सध्या जवळपास 2,500 टीईयू इतकी झाली आहे.यावेळी नाशवंत/रीफर मालाच्या बाबतीत ही संख्या 2000 टीईयू वरून 16 मार्चपर्यंत सुमारे 800 टीईयू पर्यंत घटली असल्याचे सांगण्यात आले.

## सणसर गावातील भैरवनाथ यात्रा अध्यक्ष निवडणुकीत गोंधळ,वाद आणि हाणामारी

### अखेर विक्रमसिंह निंबाळकर यांची अध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय** : सणसर गावचे ग्रामदैवत भैरवनाथ यांच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर पार पडलेली यंदाची यात्रा समिती निवडणूक अक्षरशः गोंधळ, वाद आणि हाणामारीने गाजली. परंपरेनुसार गुढीपाडव्याच्या दिवशी मंदिरात नारळ फोडून अध्यक्षपदाची निवड केली जाते; मात्र यंदा ही परंपरा वादाच्या भोवऱ्यात अडकली.

माजी अध्यक्ष अक्षय निंबाळकर व खजिनदार मिथुन बारवकर यांचा कार्यकाल संपल्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी ग्रामस्थ एकत्र आले होते.मात्र अध्यक्ष निवडीच्या दरम्यान दोन गटांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला आणि परिस्थिती थेट हाणामारीपर्यंत पोहोचली. ग्रामदैवताच्या नावाखाली होणाऱ्या या प्रकारामुळे उपस्थित ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त झाली.

अखेरीस काही ज्येष्ठ नागरिकांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.त्यानंतर अध्यक्षपदी विक्रमसिंह उर्फ नाना निंबाळकर तर खजिनदारपदी सचिन शिंदे यांची निवड करण्यात आली.

दरवर्षी अक्षय तृतीयेला मोठ्या उत्साहात साजरी होणारी भैरवनाथ यात्रा ही गावाची परंपरा आणि अस्मिता मानली जाते.मात्र याच यात्रेच्या



अध्यक्ष निवडीत झालेला गोंधळ हा गावाच्या प्रतिमेला धक्का देणारा ठरला आहे.

नवीन यात्रा कमिटी समोर आता केवळ यात्रा यशस्वीपणे पार पाडण्याचेच नव्हे, तर गावात पुन्हा एकोपा आणि शिस्त प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान उभे आहे. ग्रामस्थांनीही आता वाद विसरून यात्रेचे आयोजन शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## “निधी नाही” म्हणणाऱ्या नगरपरिषदेवर नागरिकांचा संताप; रस्ता दुरुस्तीसाठी ‘भिक मांगो’ आंदोलन!

### खड्डेमय रस्त्यामुळे जीव मुठीत घेऊन प्रवास; वाशिमकरांनी थेट १६३२ रुपयांची ‘भिक’ नगर परिषदेला सुपूर्द केली

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पाटणी चौक या अत्यंत वर्दळीच्या रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, ठिकठिकाणी पडलेले खोल खड्डे व उखडलेली गिट्टी यामुळे हा रस्ता अक्षरशः जीवघेणा ठरत आहे. या समस्येबाबत वारंवार निवेदन व तक्रारी देऊनही नगर परिषदेकडून “निधी नाही” हेच कारण पुढे करून दुर्लक्ष करण्यात येत असल्याने अखेर संतप्त वाशिमकरांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन छेडले.

दि. १८ मार्च रोजी शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी ‘भिक मांगो





आंदोलन’ करत नागरिकांकडून भिक मागून १६३२ रुपयांची रक्कम जमा केली. ही रक्कम नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे सुपूर्द करून पावतीही घेण्यात आली. “निधी नसल्याचे कारण देणाऱ्या प्रशासनाने ही रक्कम तरी वापरून रस्ता दुरुस्ती करावी,” असा टोला नागरिकांनी यावेळी लगावला.

वाशिम शहराचे आराध्य दैवत श्री बालाजी मंदिर तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणारा हा प्रमुख मार्ग असून, याच मार्गावरून दररोज हजारो नागरिक, व्यापारी व वाहनधारक प्रवास करतात. मात्र, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांना अक्षरशः त्रास सहन करावा लागत आहे.

नगर परिषदेकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने शहरातील

> **“जर तात्काळ रस्ता दुरुस्तीचे काम सुरू झाले नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल. नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असेल, तर आम्ही गप्प बसणार नाही,”**
>
> **— अजय मोतीवार**
> **सामाजिक कार्यकर्ते.**

सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली. अजय मोतीवार यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या आंदोलनात प्रतिक कांबळे, ओमप्रकाश फड, गजानन ठेंगडे, संतोष व्यास, संध्या सभादिंडे, छायाताई पवार, सखु बनसोड, भूषण देशपांडे, दिलीप भेंडेकर, भूषण मोरे, ताजू ठेकेदार, शाम दळवी, नंदू जैरव, किसनराव धोटे, संतोष इंगळे, आशुतोष वानखेडे, अमोल भेंडेकर, नरेश येल्हारे, शिवम घुगे, उध्दव मुंढे, गोलु गुप्ता, विजू पवार, मंगेश वानखेडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व शहरवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## रस्त्यावर मुली सुरक्षित कधी?” – ॲसिड हल्ल्यानंतर नीलम गोऱ्हे यांचा संताप, कडक कायद्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : नगर येथे घडलेल्या धक्कादायक ॲसिड हल्ल्याच्या घटनेनंतर विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तीव्र संताप व्यक्त करत राज्यातील मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. “मुली रस्त्यावरून जात असताना असे भ्याड हल्ले होणे अत्यंत चिंताजनक आहे. यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे,” अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

घटनेनंतर लगेचच त्यांनी नगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकरणाची माहिती घेतली. मात्र रात्रीपर्यंत आरोपीला अटक न झाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. “अशा गंभीर गुन्ह्यात आरोपी लवकरात लवकर पकडला गेला पाहिजे, अन्यथा नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते,” असे त्यांनी स्पष्ट



केले.

गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, सध्या ‘दामिनी’ फिरती पथके शाळांच्या परिसरात कार्यरत असली तरी आता शहरातील मुख्य रस्त्यांवरही त्यांची उपस्थिती वाढवणे अत्यावश्यक आहे. “मुला-मुलींना सुरक्षित वातावरण मिळणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे रस्त्यावरही कडक सुरक्षा यंत्रणा उभी राहिली पाहिजे,” अशी मागणी त्यांनी केली.

तसेच, ॲसिड हल्ल्यांसारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी स्वतंत्र आणि अधिक कठोर कायदा करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. “अशा अमानुष कृत्यांना आळा घालण्यासाठी विशेष कायदा आणि कठोर शिक्षा हीच काळाची गरज आहे,” असे त्यांनी सांगितले.

सध्या त्या पीडित मुलीच्या कुटुंबीयांच्या संपर्कात असून त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. या प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणीही त्यांनी सरकार आणि पोलिस प्रशासनाकडे केली आहे.दरम्यान, या घटनेमुळे राज्यभरातून संताप व्यक्त होत असून महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## विकसित भारतासाठी नागपूर ‘रोल मॉडेल’ ठरणार

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे आयोजित आयसीटीआरडीच्या गोलमेज परिषदेत विकसित भारताच्या दिशेने नागपूर ‘रोल मॉडेल’ ठरू शकते, असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला. ‘विकसित भारताच्या संकल्पनेत नागपूर शहराचे योगदान’ या विषयावर ही परिषद पार पडली.

या परिषदेत महापौर श्रीमती नीता ठाकरे यांनी नागपूर महानगरपालिका शाश्वत शहर विकासाच्या दिशेने विविध उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. पर्यावरणपूरक विकास, नदी स्वच्छता, सोलर योजना, जलपुनर्भरण आणि हरित उपक्रमांच्या माध्यमातून नागपूरचा सर्वांगीण विकास साधला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांनी “विकसित भारतीयातूनच विकसित भारत निर्माण होईल” असे सांगत कौशल्याधारित





मनुष्यबळ आणि स्टार्टअप्सची गरज अधोरेखित केली. तर माजी प्र-कुलगुरू डॉ. गौरीशंकर पाराशर यांनी “प्रत्येक व्यक्तीतील कल्पना समाज बदलू शकते” असे मत व्यक्त केले.

परिषदेत विविध क्षेत्रातील तज्ञांनी नागपूरला लॉजिस्टिक, मेडिकल, शिक्षण, आयटी आणि पर्यटन हब म्हणून विकसित करण्यावर भर दिला. आधुनिक वैद्यकीय सुविधा, कौशल्य विकास, स्टार्टअपसाठी निधी, तसेच क्रीडा आणि कृषी क्षेत्रातील सुधारणा यावरही चर्चा झाली.एकूणच, शाश्वत विकास, तंत्रज्ञान आणि नागरिकांच्या सहभागातून नागपूर विकसित भारताच्या दिशेने महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असा निष्कर्ष या चर्चासत्रातून पुढे आला.

## डॉ. देविदास शिंदे व डॉ. मीनल शिंदे यांना कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : नाशिक जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय "कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार" मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सिन्नर येथील गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्रा. डॉ. देविदास नामदेव शिंदे (मराठी विभाग) व डॉ. मीनल शिंदे यांना प्रदान करण्यात आला.

कविवर्य कुसुमाग्रज नगरी शिरवाडे वणी येथे आयोजित सोहळ्यात नेत्ररोगतज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, खासदार भास्करराव भगरे, मविप्रचे सरचिटणीस नितीन ठाकरे, आमदार किशोर दराडे, जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश सलादे, उपाध्यक्ष किरण





पवार व सहचिटणीस सतीश सोनवणे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा सन्मान दिला जातो. ज्ञानदानाबरोबरच मराठी भाषा सक्षमीकरण, संवर्धन व समृद्धीसाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन डॉ. शिंदे दांपत्याचा गौरव करण्यात आला.या सन्मानाबद्दल विविध स्तरांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## सर्वज्ञ पवार–चैतन्य मोरे चमकले; कर्मवीर विद्यालयाचा नवोदयवर ठसा

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे, निफाड तालुका प्रतिनिधी** : येथील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने नवोदय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपली शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. मार्च 2026 मध्ये जाहीर झालेल्या पाचवीच्या नवोदय प्रवेश परीक्षेच्या निकालात विद्यालयातील सर्वज्ञ अनिल पवार व चैतन्य प्रकाश मोरे या दोन विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवत शाळेचा नवोदयमध्ये ठसा उमटवला आहे.

या दोन्ही विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षक, पालक व ग्रामस्थांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले आहे.

या यशामागे इयत्ता पाचवीच्या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



> **“आमच्या मुलांनी मिळवलेलं हे यश म्हणजे आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेत असतानाही त्यांनी मोठ्या स्पर्धेत स्वतःचं स्थान निर्माण केलं, ही आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. यामागे शाळेच्या शिक्षकांचे अपार परिश्रम, मार्गदर्शन आणि सततचं लक्ष आहे. आमच्या मुलांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या या विद्यालयाचे आम्ही मनापासून ऋणी आहोत. पुढेही त्यांनी मोठं यश मिळवावं, हीच अपेक्षा.”**
>
> **— प्रकाश मोरे (पालक)**

विभागप्रमुख ए. एम. पवार (बुद्धिमत्ता), जे. बी. सोनवणे (गणित), आर. आर. भोये (गणित), बी. बी. गोसावी (बुद्धिमत्ता) व ए. डी. चीतुडकर (मराठी) यांनी विद्यार्थ्यांना नियोजनबद्ध पद्धतीने मार्गदर्शन करत त्यांची तयारी भक्कम केली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे अध्यक्ष व सर्व सदस्य, स्थानिक सल्लागार समिती, जनरल बॉडी सदस्य, उत्तर विभागीय सल्लागार मंडळ, पालक-शिक्षक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती तसेच

> **“ही केवळ दोन विद्यार्थ्यांची यशोगाथा नाही, तर संपूर्ण विद्यालयाच्या मेहनतीचा आणि गुणवत्तेचा विजय आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे, हे या निकालातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. आमचे शिक्षक दिवसरात्र मेहनत घेतात आणि विद्यार्थ्यांना घडवतात, त्याचे हे फलित आहे. पुढील काळातही अशाच यशस्वी विद्यार्थ्यांची परंपरा कायम ठेवण्याचा आमचा निर्धार आहे.”**
>
> **— नंदकुमार देवढे (प्राचार्य)**

माता पालक संघ यांनी समाधान व्यक्त केले.

प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे, पर्यवेक्षक सुदाम माळी, लाईफ मेंबर राजेंद्र चांदे व सर्व शिक्षक-सेवक वृंद यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अध्यात्माची गोडी लावणारा सोहळा - पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार** : वडीलधाऱ्या माणसांना अध्यात्माची आवड असतेच. पण पुढच्या पिढीलाही अध्यात्माची गोडी लावणारा हा फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळा आहे. शिस्तबद्ध नियोजनात संपन्न होणाऱ्या या सोहळ्यातून प्रत्येक जण समाधान घेऊन जातो आहे. असे प्रतिपादन जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी बुधवार ( दि. १८ ) रोजी फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना केले.

अलंकापुरीनगरीत आयोजित फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्यात पुढे



बोलताना पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे म्हणाल्या की, " आजच्या काळात नामस्मरणाची गोडी असल्याशिवाय आपल्या मनाला, संसाराला समाधान मिळणार नाही. आपली सर्व तिर्थक्षेत्र, ऊर्जाक्षेत्र विकासाची कामे शासनाने हाती घेतली आहेत. जिल्ह्यातील ३०० च्यावर असलेल्या हेमाडपंथी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी केंद्र - राज्याचा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो आहे. नामस्मरणातून मिळणारी ऊर्जा रोजच्या जीवनातील समस्या, अडचणींना पार करण्याची शक्ती देते. अशा पारायण सोहळा, कार्यक्रमातून हे सर्व सहजशक्य होते. आपण भारतीय म्हणून एकत्र राहाण्याची गरज आहे. पर्यावरण संतूलनाचे खूप मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. यादृष्टीने पारायण सांगता सोहळ्यातून दिला गेलेला प्लास्टिकमुक्तीचा संदेश खुप महत्वाचा आहे." असेही मेघना बोर्डीकर साकोरे म्हणाल्या. या वेळी ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कदम (छोटे माऊली ),सावता महाराजांचे सतरावे वंशज, फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळा ज्यांच्या संकल्पनेतून साकारला ते ह.भ.प. पंडित महाराज डाके, अविनाश बिहाणी, संजय साडेगावकर यांची विशेष उपस्थिती होती.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# "सशक्त महिला, सक्षम समाजासाठी कटिबद्ध- सौ. ममताताई प्रितम म्हात्रे महिला-बालकल्याण समिती सभापती"

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ मधील कार्यक्षम, लोकाभिमुख व विकासाभिमुख नगरसेविका सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांची महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाकडून ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सौ. ममता प्रितम म्हात्रे या २०१० पासून सामाजिक कार्यात सक्रिय असून २०२५ मध्ये त्यांनी राजकारणात पदार्पण केले. फॅशन डिझायनिंगचे शिक्षण घेतलेल्या सौ. म्हात्रे या प्रभाग क्रमांक १८ मध्ये एक संवेदनशील, तत्पर आणि उत्तरदायी लोकप्रतिनिधी म्हणून ओळखल्या जातात. "राजकारणापेक्षा समाजकारण" या विचारसरणीवर विश्वास ठेवत त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची कार्यपद्धती जपली आहे.

मा.खासदार रामशेठ ठाकूर आणि मा. नगराध्यक्ष.जे.एम. म्हात्रे यांचे आशीर्वाद तसेच आमदार प्रशांत ठाकूर , मा.विरोधीपक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांचे मार्गदर्शनपर नेतृत्व यामुळेच त्यांच्या कार्याला दिशा व बळ मिळाले असून, या सर्व वरिष्ठांच्या प्रेरणेतूनच त्यांची महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी निवड झाल्याचे मानले जात आहे. भारतीय जनता पक्षाच्या "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास" या मूलमंत्रानुसार त्यांनी आपल्या कार्यात सर्वसमावेशक विकास, पारदर्शकता, सेवा भाव व जनहित या नीतिमूल्यांना प्राधान्य दिले आहे. महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी




गेली १५ वर्षे सातत्याने काम करत १००% महिलांच्या व्यापारी-ग्राहक पेठांचे आयोजन, महिला बचतगटांना आर्थिक व प्रशिक्षण सहाय्य, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. भारतीय जनता पक्षाचा "सशक्त महिला – सक्षम समाज" हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकारला आहे. आरोग्य सेवेत त्यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, महिलांसाठी थायरॉईड व HBA1C तपासण्या, चष्मा वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, औषध वितरण यांसारख्या उपक्रमांद्वारे हजारो नागरिकांना दिलासा दिला आहे. "प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपचार" या संकल्पनेला त्यांनी प्राधान्य दिले आहे. रोजगार निर्मिती व युवक सक्षमीकरणासाठी त्यांनी रायगड व नवी मुंबई परिसरात १०,००० हून अधिक कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात योगदान दिले आहे. कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योग क्षेत्राशी समन्वय व विशेषतः दि.

> **"मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस ,भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री.रवींद्रजी चव्हाण आणि भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष सौ.चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या महिला सक्षमीकरण, आरोग्य व रोजगारविषयक धोरणांना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा मी दृढ संकल्प करते. मिळालेल्या या जबाबदारीचे संधीमध्ये रूपांतर करून शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून सकारात्मक आणि परिणामकारक काम करण्याचा माझा निर्धार आहे."**
>
> **– सौ.ममताताई प्रितम म्हात्रे सभापती, महिला-बालकल्याण समिती पनवेल महानगरपालिका**

बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ संदर्भात युवकांना मार्गदर्शन शिबिरांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण व क्रीडा क्षेत्रात त्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळातही त्यांनी संवेदनशील नेतृत्व करत पूरग्रस्त, आपत्तीग्रस्त कुटुंबांना अन्न, निवारा व जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. धाराशिव, इरशाळवाडी, महाड महापूर, निसर्ग व तौक्ते चक्रीवादळ अशा विविध प्रसंगी त्यांनी मदतीचा हात दिला आहे. आध्यात्मिक व सेवाभावी कार्यातही त्यांनी श्री क्षेत्र पंचायतन मंदिर, नढाळ (चौक) येथे भाविकांसाठी निवास, अन्नप्रसाद, मोफत सेवा तसेच शिक्षण व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून "सेवा हीच साधना" हा विचार रुजविला आहे. महिला व बालकल्याण क्षेत्रातील त्यांच्या व्यापक अनुभवाचा व उल्लेखनीय कार्याचा विचार करूनच त्यांची सभापतीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे महिला व बालकल्याण विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळून समाजातील दुर्बल घटकांना अधिक सक्षम आधार मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांनी भविष्यातही समाजहिताच्या विविध उपक्रमांद्वारे पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देत राहावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## जेसीबीचा बकेट पायाच्या मांडीमध्ये घुसला आणि एकाचा झाला मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** जेसीबीचा बकेट पायाच्या मांडीमध्ये घुसून एक इसम भिंतीमध्ये दबला गेल्याने रुग्णालयात उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी 17 मार्च रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात जेसीबी चालक आशिष रेजा (रा. जावळे गाव) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.12 मार्च रोजी अमोल अर्जुन राठोड (वय 36) हा ओमकार कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे काम चालू असलेल्या बालाजी सिम्फनी, सुकापुर येथे रस्त्यालगत जेसीबीच्या साह्याने नाल्याचे काम करत असताना तो सुपरवायझर म्हणून रस्त्यालगत उभा होता. यावेळी जेसीबीचा फावडा त्याच्या कमरेजवळ उजव्या पायाच्या मांडीमध्ये घुसला आणि तो बाजूला असलेल्या भिंतीमध्ये दबला गेला. त्यामुळे त्याला गंभीर दुखापती झाल्या. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे दाखल करण्यात आले. 16 मार्च रोजी रात्रीच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी जेसीबी क्रमांक एम एस 46 बी झेड 7725 वरील चालक आशिष रेजा याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## समीर शेख 'जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्काराने' सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार समीर बादशहा शेख यांना राज्यस्तरीय 'जिजाऊ माँसाहेब आदर्श समाजसेवक पुरस्कार २०२६' ने गौरविण्यात आले. 'शिवरायांचा मुस्लिम मावळा' म्हणून परिचित असलेले शेख हे आ. लोकनेते सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक म्हणूनही कार्यरत आहेत.

हा प्रतिष्ठेचा पुरस्कार रविवार, दिनांक १५ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता आयोजित एका विशेष सोहळ्यात श्रीमती प्राजक्ता ताई सुरेश धस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला मा. इंजि. तान्हाजी जंजिरे, ॲड. सिताराम पोकळे, तेजश्री मुळे, ॲड. कांतीलाल गव्हाणे, सुवर्णा गिऱ्हे, संगीताताई शिंदे, लक्ष्मण रेडेकर, शितल करांडे, आशा करांडे, दादासाहेब पवळ, डॉ. बाबासाहेब मुटकुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समीर शेख यांना हा पुरस्कार समाजात हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सलोखा वाढवण्यासाठी केलेल्या अविरत प्रयत्नांची दखल म्हणून जाहीर झाला आहे. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान, पत्रकारितेतून लोकांचे प्रश्न मांडण्याची त्यांची भूमिका आणि जनतेशी असलेला



थेट संवाद यामुळे ते या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.उल्लेखनीय बाब म्हणजे, एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या समीर शेख यांचा हा पहिलाच सन्मान नाही. यापूर्वीही त्यांच्या कार्याची दखल घेत विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केले आहे. त्यांच्या नावावर असलेल्या पुरस्कारांची यादी प्रभावी आहे:

· गंगाई बाबाजी आदर्श समाजसेवक पुरस्कार (३१ डिसेंबर २०२५)

· लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार (१५ नोव्हेंबर २०२५)

· राज्यस्तरीय युवक आधार शिव रत्न पुरस्कार (७ सप्टेंबर २०२५)

· राज्यस्तरीय मौलाना अब्दुल कलाम आझाद समाजसेवा पुरस्कार (२०२४-२५)

· यशवंत रत्न पुरस्कार (२०२२-२३)

समीर शेख यांच्या या सन्मानाबद्दल ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, पत्रकार अविनाश कदम, सरपंच दत्तात्रय खोटे, सरपंच परिवंत गायकवाड, राहुल खिलारे, लक्ष्मण भोसले, बाबासाहेब भोसले, सद्दाम शेख, सरपंच प्रतिभा थोरवे, सरपंच दादा करांडे, बबन करांडे, सुभाष गणगे, संतोष दाणी, अमोल जगताप, शरद रेडेकर, राजेंद्र लाड, दीपक उंबरकर, विकास साळवे, अतुल जवने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे

## एस आर बी महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमाला भेट देऊन जेष्ठ नागरिकांना दिला आनंदाचा क्षण "

**दैनिक युवक आधार**

**मनोज भालेकर/ आमगाव तालुका प्रतिनिधी** : सालेकसा तालुका जिल्हा (गोंदिया)एस.आर. बी.महिला महाविद्यालय सालेकसा गृह विज्ञान विभागातर्फे सालेकसा येथील वृद्धाश्रमाला विद्यार्थ्यांनी भेट दिली. या भेटी दरमान वृद्धाश्रमाचे संचालक मा. महेंद्र अशोक रंगारी संस्था संत कबीर बहुउद्देशीय सेवा भावी संस्था तसेच मा. डॉ. राजेंद्रजी बडोले संस्था सचिव पूर्ती बहुउद्देशीय संस्था , मा. सौ. शालिनीताई बडोले अध्यक्षा पूर्ती बहुउद्देशीय संस्था , महाविद्यालयातील विभाग प्रमुख डॉ. एस.सी. बिसेन , प्रा.नीता धकाते, प्रा.नेहा ठाकरे, प्रा.सोनाली एकुलकर, पायल पाथोडे,



अमित कोटांगले, दीक्षा टेंभुर्णीकर आणि विद्यार्थिनी प्रामुख्यानी उपस्थित होते.

ही भेट (Human Development व Food Science and Nutrition) या विषयांतर्गत विद्यार्थिनींनी वृद्धाश्रमाला शैक्षणिक भेट दिली. या भेटीचा उद्देश वृद्धांच्या जीवनशैलीचा अभ्यास करणे, त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याबद्दल माहिती घेणे तसेच त्यांच्या आहाराच्या सवयी समजून घेणे हा होता.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्यासोबत वेळ घालवला. तसेच त्यांनी फळे, बिस्किटे व इतर आवश्यक वस्तूंचे वाटप केले. त्यांच्या दैनंदिन दिनक्रम, आरोग्याच्या समस्या, मानसिक स्थिती आणि सामाजिक गरजा याबद्दल माहिती घेतली. अनेक वृद्धांना एकटेपणा, आरोग्याशी संबंधित अडचणी आणि कुटुंबापासून दूर राहण्याची भावना जाणवत असल्याचे दिसून आले.अन्नशास्त्र व पोषण या विषयाच्या दृष्टीने, वृद्धांच्या आहारात संतुलित पोषण असणे किती आवश्यक आहे याची माहिती मिळाली. त्यांना हलका, पचायला सोपा व पौष्टिक आहार देणे गरजेचे असते, याची विद्यार्थिनींना जाणीव झाली.या भेटीद्वारे विद्यार्थिनींमध्ये सहानुभूती, आदर आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना विकसित झाली. तसेच, वृद्धांच्या जीवनातील अडचणी समजून घेऊन त्यांना मदत करण्याची प्रेरणा मिळाली.ही भेट विद्यार्थिनींसाठी अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरली.

## कोकणाच्या हृदयाला लागलेला धागा ; शेतीचा त्याग आणि निसर्गाची पडझड

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : कोकणातील खेडी ओसाड होताना पाहून हृदय हेलावते. ग्रामीण माणसाची शहरी जीवनशैलीची अंधमानी आणि राजकीय नेत्यांची सत्तेची जीवघेणी स्पर्धा यामुळे निसर्गनंदन कोकण सिमेंटच्या जंगलात रूपांतरित होत आहे. शेतीचा पराभव, जीवनाचे संकटविनामूल्य धान्यामुळे शेतकऱ्यांनी शेती सोडली, मजूर मिळत नाहीत आणि तरुण पिढी शेतात हात घालत नाही. पूर्वी बैलजोडी, गायी-म्हशी, शेळ्या-कोंबड्यांवर अवलंबून असलेले स्वावलंबी जीवन आता बाजारावर गुंतले; मासे-खेकडे, घरगुती भाज्या-दुध-अंडी गमावल्या. पिकतच



नाही तर विकत कुठून? ही पिढी भविष्यात उपासमार भोगणार, असा भीष्म इशारा आहे.बिल्डरांचा विळखा, निसर्गाची लूटबाहेरील बिल्डर अमानुष पैशाने जागा खरेदी करून वृक्षतोड, काँक्रीट बंगले बुलडॉझर करतात; निसर्गाचा समतोल ढासळला. दुसऱ्या राज्यांतून हाकललेले धोकादायक उद्योग, दगड उत्खनन, जंगलतोड यांना राजकीय वरदहस्त; प्रांतवाद, दंगली, कोविडसारख्या संकटात गावाची आठवण येते, पण आता तेही धोक्यात. राजकारण्यांची लोकशाहीची विटंबनावरिष्ठांच्या चुकीच्या धोरणांना विरोध न करता सत्ता टिकवण्याची स्पर्धा कोकणाला वाळवंट बनवते. प्रगत शेतीचे राजकीय घोषणापत्र प्रत्यक्षात दुर्लक्षित; गावे भकास. तामिळनाडूप्रमाणे सुप्रीम कोर्टाने फुकट योजनांवर निर्भत्स; महाराष्ट्र सरकारनेही शेतीप्रोत्साहन, वृक्षलागवड, झर्यांचे सौंदर्यीकरण, पाळीवजनावर मदत द्यावी.खरे सुख गावातच: जागरणाची पुकारनिसर्गमित्र संस्था रान करतात; साठ-सत्तरच्या दशकातील शांत, समृद्ध जीवन पुन्हा हवी. हॉलिडे होम कल्पना वाढते, कारण चुलीवरचे जेवण, निसर्गसान्निध्य पैशाने विकत येत नाही. शहराच्या मृगजळा मागे न धावता गावात परत या – ही मानसिकता आत्मसात करा, कोकणकर भावा! निसर्गप्रेमींच्या कार्याला सलाम; प्रत्येकाने वृक्ष रोपवा, शेतीला बळ द्या. कोकणाचे सौंदर्य वाचवा, अन्यथा पुढची पिढी केवळ आठवणींवर जगेल.

## पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे नगरसेवक नितीन गावंड यांनी घेतले आशीर्वाद



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्री निवास्थानी पनवेल महानगरपालिका नगरसेवक नितीन गावंड यांनी आशीर्वाद घेतले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबन दादा पाटील तसेच शिवसैनिक कैलास पाटील, अशोक कुरूप उपस्थित होते.

## रिसोड येथे "गुढीपाडवा,कडूनिंब वाढवा" कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजीत सिंह ठाकुर :** रिसोड -चैत्र शुध्द प्रतिपदे पासून मराठी नव-वर्षाचा शुभारंभ होतो.मराठी नूतन वर्षाचे स्वागत करण्याकरीता हिंदू धर्मामध्ये बांबूच्या टोकाला नव्याकोर्या साडीसोबत,साखर गाठी आणि विशेषकरून फुलोरायुक्त कडूनिंबाची डहाळी एकत्रित बांधून गुढी उभारली जाते.गुढीसोबत टांगलेली फुलोरायुक्त कडूनिंबाची डहाळी मानवी जीवन सुख-समृध्द करण्याचा संकेत देते असे म्हणने वावगे होणार नाही.गुढीपाडव्याला स्थानपरत्वे विविध खाद्यपदार्थ मिसळून प्रसाद तयार केला जातो पण त्यामध्ये कडूनिंबाचा फुलोरा अनिवार्य असतोचं हे तेवढेच खरे.असे वक्तव्य वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी मोठेगांव रस्त्यालगत




असणार्या श्रीराम थोरात यांच्या शेतात गुढीपाडवा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशवराव हेडगेवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून "गुढीपाडवा,कडूनिंब वाढवा" कार्यक्रमादरम्यान कडूनिंबाचे रोपण करतांना व्यक्त केले.कार्यक्रमाकरिता विष्णूभाऊ कदम उपाध्यक्ष,संतोष चऱ्हाटे सदस्य नगर परिषद रिसोड,हिंदू धर्मामध्ये अनन्य साधारण महत्त्व असणाऱ्या नर्मदा परिक्रमा पूर्ण करणारे रवि कावरे,पर्यावरण प्रेमी गुणवंत थोरात ईत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये कडूनिंबाच्या रोपणा सोबतच आंबा,जांभूळ, चिंच तसेच जलद गतीने वाढणाऱ्या व गुरांना,बकऱ्यांना भरपूर प्रमाणात चारा उपलब्ध करून देणाऱ्या सुबाभूळ तसेच शेवरीच्या एकूण 700 रोपांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाचे महत्व स्पष्ट करतांना मुलंगे म्हणाले कि,जीवन जगतांना प्रत्येक व्यक्तीला आर्थिक उन्नतीसोबतचं सामाजिक उन्नती करण्याची तीव्र इच्छा निर्माण होते पण त्याकरीता मानवी शरीर सुदृढ असणे गरजेचे आहे.असे म्हणतात कि "सुदृढ शरीरात,सुदृढ मन वास करते" हे त्रिकालाबाधित सत्य आहे.ह्या अनुषंगाने प्रत्येक व्यक्तीने हप्त्यात दोन-तीन वेळा कडूनिंबाची दहा-बारा पाने चावून खाल्ल्यास किंवा कडूनिंबाच्या काडीने दात घासतांना रस पिल्यासअनेक व्याधी पासून मनुष्याची मुक्तता होते ह्यात तिळमात्र शंका नाही.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून जमिनीमध्ये निंबोळी किंवा कडूनिंबाचा पाला पाचोळा पडला तर त्या जमिनीची सुपिकता वाढून उत्पादनात सुद्धा भरपूर वाढ होते . दुसरी जमेची बाजू म्हणजे भूगर्भातील जलस्त्रोतांचे साठे टिकविण्याकरीता धूर्या-बंधार्यावर सहज गत्या अंकुरित होणाऱ्या कडूनिंबाच्या रोपाचे जतन करून त्याला वाढविणे आपले आद्य कर्तव्य आहे. तर आणि तरचं! "गुढीपाडवा,कडूनिंब वाढवा" कार्यक्रम सार्थकी लागेल. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शंकर थोरात,किरण थोरात,श्रावणी बरडे,सिमा मुलंगे,देविका थोरात, श्रीराम सरोदे इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले.

# सरकारी तांदूळ विकणा-यांचे राशन कार्डच रद्द करा

## पहाटे घरोघरी जाऊन तो तांदूळ घेणा-यांवर गुन्हा दाखल करा - जिल्हाध्यक्ष आशिष चेडगे

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा** -सरकारी राशनचा तांदूळ अखेर बाजारपेठेत खाजगी दूकानात जातोच कसा.? हा प्रकार कित्येक वर्षांपासून सुरू आहे. हा गंभीर गुन्हा असूनही साकोलीत हा प्रकार उघड्या डोळ्यांनी सुरू आहे. यात शासकीय राशनचा तांदूळ विकणा-यांचे तहसिलदार निलेश कदम यांनी थेट राशन कार्डच रद्द करा. व तो तांदूळ पहाटेपासून घरोघरी जात घेणा-यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ जिल्हाध्यक्ष आशिष चेडगे यांनी केली आहे. सरकारी तांदूळ १५ ते २० रूपयांना घेणे व नंतर राईस मिलमध्ये जाऊन बारीक करीत तोच शासकीय तांदूळ ५० ते ६० रू किलो भावाने विकण्याचा तांदळाचा गोरखधंदा व काळाबाजार करणाऱ्यांवर अन्न व नागरी पुरवठा निरीक्षक तहसिल प्रशासन काय कारवाई करीत आहेत. कारण सरकारी राशनचा ( सार्वजनिक



वितरण प्रणाली ) तांदूळ किंवा इतर धान्य गैरमार्गाने विकणे हा गंभीर दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. याबाबतची महत्त्वाची माहिती अशी की, रेशनचे धान्य खुल्या बाजारात विकणे, खरेदी करणे किंवा त्याची बेकायदेशीर वाहतूक करणे हा अत्यावश्यक वस्तू कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या अंतर्गत गुन्हा आहे अशी कायदेशीर कारवाई होते. अश्या गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींवर, मग ते रेशन दुकानदार असोत किंवा धान्य विकणारे लाभार्थी अथवा खाजगी धान्य दुकानदार त्यांच्यावर कडक कारवाई केली जाऊन शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे. यामध्ये परवाना रद्द करणे, जप्ती आणि कारावासाची शिक्षा होऊ शकते. गैरमार्गाने तांदूळ विकल्यास दखलपात्र ( ज्यामध्ये पोलीसांतर्फे थेट अटक होणे ) आणि अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येतो. रेशनचे धान्य काळ्या बाजारात विकले जाऊ नये म्हणून विशेष पथकांद्वारे छापे टाकले जातात आणि गुन्हे नोंदवले जातात. थोडक्यात सांगायचे तर, राशनचे धान्य हे केवळ गरीब आणि पात्र लाभार्थ्यांच्या खाण्यासाठी असते. ते विकणे कायद्याने प्रतिबंधित आहे. असे शासकीय नियमांत असतांना सुध्दा साकोली सेंदूरवाफा शहरातील विविध प्रभागांमध्ये काही काळाबाजार करणारे दुकानदार भल्या पहाटेपासून लोकांना आवाज देत उठवितात व त्यांकडून हा रेशनचा तांदूळ विकत घेत राईस मिलमध्ये बारीक करीत तोच तांदूळ बड्या भावात विकतात. हा संपूर्ण काळाबाजारावर तातडीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र, भंडारा जिल्हाध्यक्ष आशिष चेडगे यांनी केली आहे.

> **"या संतापजनक प्रकारावर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल होतो. सदर अन्न व नागरी पुरवठा विभाग या शासनाच्या मालाची काळाबाजारीवर कुंभकर्णी झोपेत का आहे.? मा. तहसिलदार निलेश कदम यांनी येणाऱ्या राशन वाटप नंतर दुसऱ्या दिवशी सर्व वितरण केलेल्या लाभार्थ्यांची चौकशी लावावी व मिळालेले राशन तपासणी करावी. व तो कुठे गेले यांची चौकशी करून दोषींवर कारवाई व गुन्हा दाखल करावा"**
>
> **-- आशिष चेडगे**
>
> **"जिल्हा अध्यक्ष" प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ जिल्हा भंडारा**

# घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर उघड; तहसील पथकाची धडक कारवाई!

### मालेगाव शहरातील १४ हॉटेल-नाश्ता केंद्रांची तपासणी; दोन ठिकाणी सिलेंडर जप्त



**दैनिक युवक अधार**

**तालुका प्रतिनिधी/प्रकाश भुरे** : मालेगाव शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा अवैधरित्या व्यावसायिक वापर होत असल्याच्या तक्रारींची दखल घेत तहसील प्रशासनाने धडक कारवाई करत शहरातील हॉटेल्स,रेस्टॉरंट व चहा-नाश्ता केंद्रांवर अचानक छापे टाकले या मोहिमेत एकूण १४ ठिकाणी तपासणी करण्यात आली

तर दोन ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याचे उघड झाले तहसील पथकाने अचानक केलेल्या या कारवाईत शेलू फाटा मालेगाव,अकोला फाटा मालेगाव,या दोन ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर व्यवसायासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले. यावेळी संबंधितांकडून घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे गॅस सिलेंडरच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने घरगुती गॅसचा गैरवापर रोखण्यासाठी सतत तपासणी मोहीम राबविण्याचा इशारा दिला आहे. अशा प्रकारे घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या कारवाईत निरीक्षण अधिकारी बळीराम वांजोळ,मंडळ अधिकारी नागेश घुगे,ग्राम महसूल अधिकारी धनंजय राऊत,कनिष्ठ लिपिक अजित पखाले,कोतवाल ओम राऊत तसेच गणेश चौके (शिपाई, तहसील कार्यालय मालेगाव) यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचारी सहभागी होते प्रशासनाच्या या कारवाईमुळे घरगुती गॅसचा गैरवापर करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून शहरातील हॉटेल व नाश्ता केंद्रांमध्ये सावधगिरीचे वातावरण निर्माण झाले आहे.



**फिरता ज्ञानेश्वरी पारायण सोहळा अलंकापुरी मयुरी पार्क सेलू येथे सांगता सोहळ्याची आज शेवटची समाप्ती पार पार पडली आहे हा सोहळा नियोजनबद्ध व दिमागदारपणे विशेष गुरुजनांच्या आशीर्वादाने व परभणी जिल्हा व परतुर तालुका यांच्या सर्व सेवक मंडळींनी वसाहत संपन्न झाला आहे आजच्या सोहळ्याचे विशेष पुरणपोळी आमटी दूध 300 किलो तूप अडीच हजार लिटर मठ्ठा अशा विविध पदार्थांनी हा दिमागदार सोहळा पार पडला असून या सोहळ्यासाठी सभोवतालच्या जिल्ह्यातील लाखोच्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती या सोहळ्यासाठी सातोना येथील ग्रामस्थांनी पाच कुंटल गुलाब जामुन व पर्यावरण मुक्त पावती मुक्त ज्ञानेश्वर महाराजांचा साडेसातशे जन्मशताब्दी सोहळ्याचा हा भव्य दिव्य कार्यक्रम सेलू या ठिकाणी आज संपन्न झाला आहे**

**( दैनिक युवक आधार )**

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा – स्पर्धा परीक्षांचे यशाचे केंद्र

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा ही आज केवळ एक शाळा नसून स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने यश मिळवणारे एक प्रेरणादायी केंद्र म्हणून ओळख निर्माण करत आहे. या शाळेने शिक्षणाच्या गुणवत्तेचा उच्च दर्जा राखत विविध स्तरांवरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**नवोदय विद्यालयातील यश**

अतिशय अभिमानाची बाब म्हणजे नुकत्याच जाहीर झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत या शाळेची विद्यार्थिनी कु. श्रावणी बाळासाहेब देशमुख हिची निवड झाली आहे. हे यश शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष देणारे आहे.

**एन.एम.एम.एस. परीक्षेतील यश**

याचबरोबर, राष्ट्रीय स्तरावरील एन.एम.एम.एस. (National Means-cum-Merit Scholarship) परीक्षेतसार्थक खुळे, स्नेहल जाधव आणि भाग्यश्री शिंदे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**शिष्यवृत्ती परीक्षेतील यश**

तसेच मागील वर्षी इयत्ता आठवीतील




शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी भाग्यश्री गजानन कांबळे, शिवम विजय कांगणे

**इतर स्पर्धांमधील कामगिरी**

- जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- जिल्हास्तरीय परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक

मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा अभियानात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक, तसेच सध्या जिल्हास्तरावरही सक्रिय सहभाग

या सर्व यशांवरून स्पष्ट होते की, राज्यस्तर, जिल्हास्तर किंवा तालुकास्तर — कोणतीही स्पर्धा असो, यश हे दुधा शाळेचेच!

आज "स्पर्धा परीक्षा कोणतीही असो, यश मात्र दुधा शाळेचे" हे समीकरण वास्तवात उतरलेले आहे.

**यशामागील सक्षम शिक्षकवर्ग**

या सर्व यशामागे शाळेतील समर्पित व दूरदृष्टी असलेले शिक्षक कार्यरत आहेत:

मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर

उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध कार्यपद्धती व NMMS परीक्षा प्रमुखसह सर्व स्पर्धा परीक्षा विभाग स्वतः कडे ठेऊन विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारे नेतृत्व

श्री निलेश पिसे सर

इंग्रजी विषयाचे तज्ञ, शिष्यवृत्ती परीक्षा प्रमुख , उपक्रमशील व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे मार्गदर्शक

श्री पंजाब दांदडे सर

गणित विषयातील तज्ञ, नवोदय स्पर्धा परीक्षा प्रमुख तसेच विद्यार्थ्यांसाठी मोफत ऑनलाइन शिष्यवृत्ती नवोदय वर्ग उपलब्ध करून देणारे प्रेरणादायी शिक्षक

हे त्रिकूट अत्यंत उत्साहाने कार्य करत असून परिसरात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र म्हणून शाळेची ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाले आहे.

**गावकऱ्यांचे सहकार्य – यशाची खरी ताकद**

दुधा शाळेच्या या यशामागे केवळ शिक्षकांचेच नव्हे तर गावकऱ्यांचे सहकार्य, पाठबळ आणि सकारात्मक दृष्टीकोन देखील तितकाच महत्त्वाचा आहे. शाळा आणि समाज यांच्यातील समन्वयामुळेच ही प्रगती शक्य झाली आहे.

**समारोप**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा ही आज एक आदर्श निर्माण करणारी शाळा ठरली आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, स्पर्धा परीक्षांतील सातत्यपूर्ण यश आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या त्रिसूत्रीवर चालणारी ही शाळा निश्चितच इतरांसाठी प्रेरणास्थान आहे.

**"यशाची परंपरा जपणारी – दुधा शाळा!"**

# सिद्राम नारायणकर संत रोहिदास जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे) :** राष्ट्रीय चर्मकार संघाचा शानदार रौप्य महोत्सवी सोहळा धारावीतील पद्मभूषण मनोहर जोशी महाविद्यालयाच्या प्रांगणात नुकताच संपन्न झाला.यावेळी राष्ट्रीय चर्मकार संघाचे संस्थापक- राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार बाबुराव माने यांच्यासह प्रा.विजय मोहिते,प्रजासत्ताक जनता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रबुद्ध साठे,ॲड सिध्दार्थ हत्तरकर,समस्त कक्कया समाज महासंघाचे अध्यक्ष निवृत्ती सावळकर,राष्ट्रीय चर्मकार संघाचे नेते रामभाऊ कदम,परशुराम इंगोले,राष्ट्रीय चर्मकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सूर्यकांत गवळी, समस्त कक्कय्या समाज महासंघ मुंबई अध्यक्ष राम कोकणे, संत कक्कय्या विकास संस्था धारावीचे सचिव राजेश खंदारे, नगरसेविका अर्चनाताई शिंदे आदी मान्यवर समाज बांधव मोठया संख्येने




उपस्थित होते.

यावेळी समाजासाठी योग्यदान दिलेल्या मान्यवर व्यक्तीचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी सिद्राम मारुती नारायणकर यांना त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून संत रोहिदास जीवन गौरव पुरस्काराने मान्यवर व्यक्तीच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची गुढी उंचच उंच जात राहो : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव/वाडी नागपूर** : 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची गुढी उंचच उंच जात राहो', अशा शुभेच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी गुढीपाडवा मराठी नववर्ष दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होताना दिल्यात.

श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आणि नववर्ष अभिनंदन समारोह समितीच्या वतीने नागपुरात लक्ष्मीनगर चौकात नववर्षदिनाच्या निमित्ताने शोभायात्रा आणि रामरक्षा पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकर या याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तात्या टोपे नगरातील श्री गणेश मंदिरापासून या शोभायात्रेला सुरुवात झाली. त्यात मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस, अभिनेत्री सई ताम्हणकर, ट्रस्टचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी आणि इतर मान्यवरांसह महिलांचे ढोलपथक, रामायणातील पात्रांच्या वेशभुषा केलेले कलाकार तसेच मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक सहभागी झाले होते.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रत्येक हिंदू आणि मराठी माणसासाठी हा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. आजपासून आपण सारे आपल्या नूतन संकल्पांची सुरुवात करतो आणि आपल्या जीवनाला सामोरे जातो. ही गुढी भारताची गुढी असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ही गुढी उंचच उंच जात राहो, अशा शुभेच्छा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्यात. याप्रसंगी सामुहिक रामरक्षा पठण तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते गुढीचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी, अभिनेत्री सई ताम्हणकर यांनी सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष संदीप जोशी यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

# शिराळ येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन; यावर्षी होणार नारीशक्तीचा सन्मान कीर्तन महोत्सव

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : सालाबाद प्रमाणे होणारा अखंड हरिनाम सप्ताह यावर्षी नारीशक्ती सन्मान सोहळ्याने अध्यात्मिक क्षेत्रात दिशा देणारा ठरणार आहे.यावर्षी शिराळ ता. आष्टी जि.बीड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहाबाबत संयोजक समितीने सांगितले आहे की , प्रत्येक वर्षी कीर्तन महोत्सवात पुरुष कीर्तनकारांचे कीर्तन आयोजित करण्यात येत असत परंतु यावर्षी राज्याला दिशा देणारा कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे यामध्ये गुढीपाडव्यापासून सुरू होणाऱ्या कीर्तन महोत्सवात यावर्षी शंभर टक्के महिला कीर्तनकारांचा समावेश करण्यात आला आहे. रात्री ०९ ते ११ या वेळेत गुढीपाडव्यापासून दि.१९/०३/२०२६ रोजी ह.भ.प. प्रतीक्षाताई करडूळे ,२०/०३/२०२६ ह.भ.प. दिपालीताई खिळे ,२१/०३/२०२६ ह.भ.प. वणीताताई पाटील ,२२/०३/२०२६ ह.भ.प. शालिनीताई देशमुख इंदोरीकर ,२३/०३/२०२६ ह.भ.प. आरतीताई शिंगोळे ( खाटेघरे) ,२४/०३/२०२६ ह.भ.प. साध्वी आरतीताई शिंदे ,२५/०३/२०२६ ह.भ.प. कांचनताई जगताप , यांचे कीर्तन होणार असून त्यानंतर रामजन्म उत्सवा निमित्त श्रीमद् भागवत कथाकार ह.भ.प. साध्वी सोनाली दीदी करपे यांच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे अशी माहिती शिराळ ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली आहे. तरी तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा ही विनंती करण्यात आली आहे. यावेळी सातही दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

**राज्याला दिशा देणारा कीर्तन महोत्सव**

अखंड हरिनाम सप्ताह मध्ये शंभर टक्के महिला कीर्तनकारांचा समावेश करून नारी शक्तीचा सन्मान होणारा हा सप्ताह सोहळा राज्याला नवी दिशा देणारा ठरणार. यामध्ये कीर्तनकारांपासून पखवाज वादक , हार्मोनियम वादक , गायनाचार्य , तसेच हरिपाठ व टाळकरी सेवा अन्नपूर्णा माता वारकरी शिक्षण संस्था चकलंबा यांची होणार आहे.

# पत्रकार जावेद शेख यांची तत्परता, पंधरा ते वीस दिवसांच्या पाडसाचे प्राण वाचवून मानवतेचा आदर्श

### कुत्र्यांच्या तावडीतून हरणाच्या पाडसाला मिळवून दिले जीवनदान...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :-** पाटोदा तालुक्यातील गितेवाडी शिवारात एक हृदयस्पर्शी घटना घडली असून, पत्रकार जावेद शेख यांनी प्रसंगावधान राखत हरणाच्या पाडसाचे प्राण वाचवले. त्यांच्या या धाडसी कृतीमुळे एका निरपराध वन्यजीवाला नवजीवन मिळाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार पत्रकार जावेद शेख यांचे शेत गितेवाडी शिवारात असून ते दिनांक १९/०३/२०२६ गुरूवार रोजी सकाळी ८:३० वाजण्याच्या सुमारास शेतामध्ये फेरफटका मारायला गेले असता त्यांना कुत्र्यांचा भुंकण्याचा आवाज ऐकू आला. सुरुवातीला त्यांनी त्या कडे दुर्लक्ष



केले. मात्र त्यात त्यांना काहीसा वेगळा आवाज जाणवल्याने त्यांनी तत्काळ त्या दिशेने धाव घेतली. घटनास्थळी पोहोचताच त्यांनी पाहिले की अंदाजे १५ ते २० दिवसांचे हरणाचे पाडस कुत्र्यांच्या तावडीत सापडले असून त्याला कुत्र्यांनी घेरून ठेवले आहे. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता धाडसाने कुत्र्यांना हुसकावून लावत त्या पाडसाला सुरक्षित बाहेर काढले. व त्या नंतर त्यांनी पाडसाला पाणी पाजून आपल्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सुरक्षित ठेवले. पुढे त्यांनी तत्काळ वन विभागाचे वनसेवक शहादेव पवार यांना संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच तात्काळ वनसेवक विजय जाधव, शहादेव पवार आणि पोपट पवार यांनी घटनास्थळी धाव घेत पाडसाला ताब्यात घेतले. त्यांच्या वेळेवर हस्तक्षेपामुळे पाडसाचे प्राण वाचले. पत्रकार जावेद शेख यांच्या या संवेदनशील आणि धाडसी कृतीचे सर्व स्तरातून कौतुक होत असून त्यांनी दाखवलेली मानवता आणि वन्यजीवांविषयीची जाणीव समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने पुण्यातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पुणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)** : विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहर महाराष्ट्रात ओळखल जात, दिनांक 18 मार्च 2026 रोजी , 8 मार्च रोजी साजरा झालेल्या जागतिक महिला दिनाचे निमित्त साधून जनजागृती सेवा संस्था, ठाणे बदलापूर यांच्या वतीने एक अत्यंत देखणा सत्कार समारंभ पुणे येथील रितिका कॉम्प्लेक्स नऱ्हे रोड धायरी फाटा येथील कै. सौ शालन शिवराम चव्हाण सभागृहामध्ये अत्यंत दिमाखामध्ये आणि उत्साहामध्ये पार पडला. याप्रसंगी पुण्यामधील विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्ववान कार्याने समाजात मानाचे स्थान निर्माण करणाऱ्या सेवाभावी आणि कर्तुत्व सिद्ध केलेल्या महिलांचा गुणगौरव करून सत्कार करण्यात आला.

हा गुणगौरव आणि सत्कार करण्यासाठी पुण्यामधील विविध क्षेत्रात भरारी घेणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक, उद्योग क्षेत्र, साहित्य, कायदा, कला क्रीडा, वैद्यकीय, सामाजिक विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पुणे स्थित महिलांचा सत्कार करण्यात आला . गौरवांकित सर्व स्त्रियांचा सत्कार करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवर यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉक्टर आम्रपाली मोहिते, व्यसनमुक्ती समुपदेशक, तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या समस्येविका.. एडवोकेट अनिशा फणसळकर ज्येष्ठ विधीज्ञ आणि आमोदिनी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष, प्राध्यापिका डॉक्टर भाग्यश्री जोगदेव, साहित्यिक ,शिक्षणतज्ञ , रेशा अभ्यंकर, मानसोपचार तज्ञ आणि सल्लागार, ज्योती नाळे, संपादिका दैनिक संध्या पुणे, शिवराम चव्हाण, डायरेक्टर-ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट, एडवोकेट सचिन देवांग संस्थापक कोष्टी व्हिजन ट्रस्ट , श्री रामजीत गुप्ता, मुख्य तपास अधिकारी, अँटी पायरोसी सेल, जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री गुरुनाथ तिरुपणकर सर, संस्थेच्या सचिव सौ संचिता भंडारी, खजिनदार दत्ता कडूलकर, उपाध्यक्ष महेश्वर तेटांबे व अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने सर्व मान्यवर प्रमुख पाहुण्यांचा देखील सत्कार गुलाब पुष्प, शाल, मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन करण्यात आला. सर्वच मान्यवरांनी महिला दिनाचे औचित्य साधत स्त्रियांमधील क्षमता, स्त्री पुरुष समानतेमधून देखील स्त्रिया करत असलेले उल्लेखनीय कार्य, स्त्रियांचे खरे सक्षमीकरण, आपल्यामधील क्षमता सिद्ध करण्यासाठी कोणावरही अन्याय न करता स्वबळावर कसे पुढे जावे, स्त्रियांनीच स्त्रियांना पुढे जाण्यासाठी कसे प्रवृत्त करावे, स्त्री आणि पुरुष अशा दोन्ही हिंदोळ्यावर जगताना देखील एक पुरुषांमधील स्त्री देखील स्वतःसाठी आणि समाजासाठी किती कळकळीने काम करू शकते, अशा विविध विचारांचे आदान प्रदान करत स्त्री खऱ्या अर्थाने अशा सन्मानास कशी पात्र आहे आणि हा गुणगौरव एक दिवसाचा न ठरता तो वर्षभर कसा साजरा करता येईल तसेच स्त्री आणि पुरुष दोघांनी एकमेकांचा आदर करत समाजाला कसे पुढे न्यावे याविषयी भाष्य करत सर्व प्रेक्षकांचे लक्ष खिळवून ठेवले. सर्वच मान्यवरांच्या उद्बोधक अशा विचारांमुळे प्रेक्षागृहातील उपस्थितांचे मन हेलावून गेले.

यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. उपस्थित राहिलेल्या सत्कारार्थी स्त्रियांचा सत्कार, सन्मान आणि गुणगौरव प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांना शाल, गुलाबपुष्प, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र तसेच आकर्षक पेन देऊन अत्यंत प्रेमाने करण्यात आला.या कार्यक्रमास संस्थेचे सर्वेसर्वा श्री गुरुनाथ तिरपणकर सर आणि त्यांचे पदाधिकारी मुंबईहून खास उपस्थित राहिले होते.संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी संस्थेच्या पाच वर्षातील कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सौ तिरपणकर वहिनी, श्री. शिवराम चव्हाण सर, या सर्वांनी खूपच कष्ट घेतले आणि कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे साजरा केला.कार्यक्रमानंतर उपस्थितानी आवर्जून असा कार्यक्रम घेऊन तो यशस्वी केल्याबद्दल गौरवोत्गार काढले. जनजागृती सेवा संस्थेने पुण्यात घेतलेला हा कार्यक्रम अगदी मनापासून लक्षात राहील असाच होता. अशा दिमाखदार सोहळयास उपस्थित राहण्याचे भाग्य लाभल्याबद्दल सर्वांनी आपापल्या परीने आभार प्रकट केले. जनजागृती सेवा संस्थेचे हे कार्य निश्चितच अभिमानास्पद आणि कौतुकास पात्र आहे. जनजागृती ही संस्था खऱ्या अर्थाने लोकांमध्ये जनजागृती करण्याचे महान कार्य करीत असून या संस्थेचे कार्य सर्वदूर लोकांपर्यंत पोहोचावे आणि त्यात आपला सहभाग असावा असं प्रत्येकाने सांगून संस्थेस शुभेच्छा दिल्या. जनजागृती संस्थेस मनापासून धन्यवाद आणि संस्थेची कीर्ती लोकोत्तर अशीच वृद्धिंगत होत राहो या सदिच्छा, शुभेच्छा सत्कारमूर्तींनी दिल्या.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संस्थेच्या सचिव सौ.संचिता भंडारी यांनी केले व आभार संस्थेचे उपाध्यक्ष महेश्वर तेटांबे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामजित(जितु) गुप्ता, संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर,रहुनाथ ढोक, शिवराम चव्हाण, ॲड.अनिशा फणसळकर, यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मोरेगाव व परिसरामध्ये अवकाळी पाऊस झाल्याने शेत मालाचे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/विठ्ठल काळे (सेलू)** : सेलू तालुक्यासह मोरेगांव व आजूबाजूच्या परिसरात आज दिनांक 19 रोजी सकाळच्या पाच वाजेपासून दमदार पावसाच्या आगमन झाले.या अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.या पावसामुळे गहू, ज्वारी,हरभरा व बियाण्याचा कांदा, या पिकांचे मोठ्या प्रमाणात मुस्कान झाले असून, शेतकऱ्यांच्या पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. परिणामी शेतीमालाचे नुकसान झाले असून शासनाने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देण्यात द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



**पाटोदा येथे संजय ससाणे (डोमरीकर) यांच्या संजय एंटरप्राईजेस या दुकानास सदिच्छा भेट देऊन शुभेच्छा देतांना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे संस्थापक/अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे व रिपाईचे तालुकाध्यक्ष डॉ.नरेंद्र जावळे.**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा)**

## जालना जिल्ह्यात अवकाळी वादळ, पाऊस व गारपिटीचा इशारा; शेतकऱ्यांनी सतर्क राहावे – आ. बबनराव लोणीकर

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे/उपसंपादक महाराष्ट्र** : हवामान खात्याने जालना जिल्ह्यासह परिसरात अवकाळी वादळ, पाऊस तसेच गारपिट होण्याचा इशारा दिल्याने संपूर्ण प्रशासन यंत्रणा सतर्क झाली असून शेतकरी बांधवांनीही तातडीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन भाजपा नेते, माजी मंत्री, परतूर–मंठा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

अवकाळी हवामानामुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी तसेच भाजीपाला पिकांना या बदलत्या हवामानाचा फटका बसू शकतो. यामुळे शेतकऱ्यांनी पिकांची योग्य ती काळजी घेण्याबरोबरच काढणीस तयार असलेला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवावा, असेही त्यांनी सुचविले.

तसेच जनावरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना उघड्यावर न ठेवता सुरक्षित छपराखाली बांधून ठेवावे, वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा विजेच्या खांबाजवळ थांबणे टाळावे, विजांचा कडकडाट व वादळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व नागरिकांनी स्वतःचीही काळजी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, संभाव्य नुकसानीनंतर शासकीय मदत मिळविण्यासाठी पंचनामा प्रक्रिया महत्त्वाची ठरणार असल्याने शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचे किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याचे फोटो व व्हिडिओ मोबाईलमध्ये स्पष्टपणे नोंदवून ठेवावेत, असेही आवाहन आमदार लोणीकर यांनी केले आहे. यामुळे पंचनाम्याच्या वेळी अचूक नोंद होण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच परतूर, मंठा व जालना येथील तहसीलदारांना विशेष सूचना देत आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रशासनानेही गावपातळीवर तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून नुकसान झाल्यास तातडीने पंचनामे करण्यासाठी पथके तयार ठेवण्यात येत आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

हवामानातील अचानक बदल लक्षात घेता पुढील काही दिवस शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे



ठरणार असून सतर्कता आणि योग्य नियोजन केल्यास संभाव्य नुकसान टाळता येऊ शकते, असा विश्वासही आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला आहे.

**जालना शहरात बारीक गारांसह जोरदार पावसाची सुरुवात**

जालना : शहरात आज अचानक हवामानात बदल होऊन बारीक गारांसह जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. दुपारनंतर आकाशात ढग दाटून आले होते, त्यानंतर काही वेळातच विजांच्या कडकडाटासह पावसाने जोर धरला. अनेक ठिकाणी बारीक गाराही पडत असल्याने नागरिकांमध्ये काहीशी धावपळ उडाल्याचे चित्र दिसून आले.

अचानक आलेल्या या पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचण्यास सुरुवात झाली असून वाहतुकीवरही काही प्रमाणात परिणाम झाला आहे. दुचाकीस्वार व पादचारी नागरिकांना या पावसाचा फटका बसत आहे. बाजारपेठेतही नागरिकांनी आश्रयासाठी धाव घेतल्याचे दिसून आले.दरम्यान, जिल्ह्यात अवकाळी पाऊस व गारपिटीचा अंदाज यापूर्वीच हवामान खात्याने व्यक्त केला होता. त्यानुसार प्रत्यक्षात पावसाला सुरुवात झाल्याने शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उभ्या पिकांना या पावसाचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## खारघरमध्ये गुढीपाडव्याच्या निमित्ताने भव्य बाईक रॅली; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**

**खारघर प्रतिनिधी** : परिणिता फाउंडेशन व सकल हिंदू समाज यांच्या वतीने गुढीपाडव्यानिमित्त नवीन वर्षाच्या स्वागतासाठी खारघर येथे भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.या उपक्रमात भावना मोटर्स होंडा शोरूमसह विविध सामाजिक संस्थांनीही सक्रिय सहभाग घेतला. परिणिता फाउंडेशनच्या अध्यक्षा साक्षी सागवेकर यांनी 'व्यसनमुक्ती' ही सामाजिक जाणीव निर्माण





**व्यसनमुक्तीचा संदेश**

करणारी थीम घेऊन रॅलीचे आयोजन केले होते. या माध्यमातून समाजामध्ये व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश देत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमासाठी नगरसेवक मधु पाटील, भाजप खारघर उपाध्यक्ष अजित अडसूळ, दैनिक युवक आधारचे मुख्य संपादक संतोष शिवदास आमले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नववर्षाच्या स्वागतासोबतच सामाजिक संदेश देणारी ही रॅली खारघरमध्ये एक आदर्श उपक्रम ठरली असून नागरिकांकडून या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे सदर कार्यक्रमास मधुराज डेव्हलपर,साई पलक डेव्हलपर, ईपीआर, भावना होंडा, अजित अडसुळे यांचे विशेष सहकारी लाभले तसेंच ईपीआर वतीने राबवण्यात आलेल्या खा,खेला,वाचा या उपक्रम ची माहिती दिली

## सूर्योदय पाहून मुंबईकडे परतत असताना व्होक्सवॅगन पोलो गाडीचा अपघात; तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर लोणावळा परिसरात गुरुवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात आयआयटी बॉम्बेच्या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. सूर्योदय पाहून मुंबईकडे परतत असताना हा अपघात घडल्याने शैक्षणिक वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे.मृत विद्यार्थ्यांमध्ये नाशिक येथे मूळ राहणारा ओमकुमार बोरसे (२३), नागपूर येथील लय देशभ्रतार (२०) आणि जयपूर येथे मूळ राहणारा श्रेयांश शर्मा (२२) यांचा समावेश आहे. हे



तिघे व्होक्सवॅगन पोलो कारमधून प्रवास करत होते. हे विद्यार्थी आपल्या अन्य मित्रांसह दुसऱ्या वाहनातून गुरुवारी पहाटे सुमारे ५ वाजता पवई येथील आयआयटी बॉम्बे कॅम्पसमधून खंडाळ्याकडे सूर्योदय पाहण्यासाठी रवाना झाले होते. सूर्योदय पाहिल्यानंतर ते मुंबईकडे परतत असताना पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावरील पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत भाताण बोगद्याच्या नजीक एका अज्ञात ट्रेलरच्या पाठीमागील खाली बाजूस त्यांची गाडी घुसून झालेल्या अपघातात गाडीतील तिघे जण गंभीर जखमी झाले असता त्यांना उपचाराकरिता कामोठे येथील महात्मा गांधी मिशन (एमजीएम) रूग्णालयात आणण्यात आले. मात्र रूग्णालयात पोहचेपर्यंत त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा संगम – सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेरचे स्नेहसंमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी/ भीमराव गावडे** : प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर चे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेनेचे मा.जिल्हाप्रमुख श्री. परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते संपन्न झाले तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड प्रहार चे संपादक अशोक नाना होळकर, नाथापुर केंद्रांचे केंद्रप्रमुख गोविंद सारडा सर, पत्रकार जुनेद कुरेशी, पत्रकार गणेश तांबे, गोरक नाना कांडेकर, लक्ष्मण तात्या पैठणे, आरुण भाऊ बोंगाणे, पिणु राजे डांगे,साईनाथ गव्हाणे,कुंडलिक लटपटे सर(स्वामी विवेकानंद विद्यालय बावी )श्री साईनाथ गावडे सर (संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल मादळमोही )प्रा.नागरगोजे सर, सरपंच बाबुराव मोरे, उपसरपंच राजेंद्र वीर, उपसरपंच कैलास थोटे, बाळासाहेब यादव सह परिसरातील सर्व शिक्षणप्रेमी माता पालक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते....



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतीमेचे पुजन करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आली.... कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.रामेश्वर सातपुते सर यांनी केले तर प्रमुख मान्यवरांमध्ये अशोक नाना होळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी या प्रसंगी शाळेचे व शाळेत चालत असलेल्या शैक्षणिक गुणवत्ता, सांस्कृतिक वेगळेपण, पिंपळनेर परिसराला एक निर्णायक शैक्षणिक वातावरण तयार करणारी सृजनशील शाळा अशा शब्दांत शाळेचा गौरव केला....

तर अध्यक्षीय मनोगतात शिवसेनेचे मा.जिल्हाप्रमुख श्री.परमेश्वर सातपुते सर यांनी ग्रामीण भागात सुद्धा शहराच्या तोडीस तोड वार्षिक स्नेहसंमेलन साजरे होतात आणि ते माझ्या परिसरात होतात याचा मला अभिमान आहे आणि या पुढील काळात आपल्या परिसरात शैक्षणिक क्षेत्रात आपल्या सर्वांना मिळुन काम करायचे आहे असे आव्हान उपस्थित पालक व शिक्षणप्रेमींना केले त्याच बरोबर या शाळेची प्रशंसा मी करतो यात नवल नाही परंतु स्वतः पालक या शाळेच्या प्रगतीची चर्चा करतात याचा अर्थ शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावत आहे असे मत व्यक्त केले....


आगामी काळात परिसरात उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्था, शाळा असतील त्यांच्या पाठीशी आम्ही खंबीर पणे उभा राहु असा शब्द दिला.....

या कार्यक्रमाची सुरुवात मोरया...मोरया या गिताने झाली त्याचबरोबर या कार्यक्रमात देशभक्तिपर गीते, कोळी गीते, भक्ती गीते, समाज प्रबोधनावर अधारीत नाटकं, लावणी अशा बहारदार गीतांवर लहान बाल कलाकारांनी बहारदार नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष प्रा.रामेश्वर सातपुते सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.विलास आरे सर, प्रा.चंद्रशेखर साळवे सर, प्रा.जिवन नागरगोजे सर, प्रा.संतोष नागरगोजे सर, सौ.शितल सातपुते मॅडम, सौ.ज्योती नरवडे मॅडम, किरण साळवे मॅडम, सौ.कीर्ती सातपुते मॅडम, सौ.मंजुश्री पौळ मॅडम, सौ.ज्योती खांडे मॅडम, सौ.सारिका सावंत मॅडम, सौ.गौरी शिंदे मॅडम, पार्वती तिरगुळ मावशी,श्री.हानुमान तात्या खांडे, श्री.निलेश वंजारे,श्री.गणेश कुटे, श्री.भरत खांडे,श्री.अकाश नांदुरकर, कुटे मामा यांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

# चवदार तळे सत्याग्रह : पाण्याच्या एका घोटासाठी लढलेली मानवतेची क्रांती

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत की त्या केवळ आंदोलन नसतात, तर त्या मानवी स्वाभिमानाच्या क्रांतीचे टर्निंग पॉइंट ठरतात. ज्या घटनांनी हजारो वर्षांच्या सामाजिक अन्यायाला थेट आव्हान दिले, समाजाच्या अंतरात्म्याला हादरवले आणि समानतेच्या संघर्षाला नवे बळ दिले. अशीच एक ऐतिहासिक घटना म्हणजे महाड सत्याग्रह, ज्याला आपण चवदार तळे सत्याग्रह म्हणून ओळखतो. हा सत्याग्रह केवळ पाण्यासाठी नव्हता; तो होता मानवी हक्कांसाठीचा, स्वाभिमानासाठीचा आणि समतेसाठीचा लढा. एका घोट पाण्यासाठी दलित समाजाला शतकानुशतके झुंज द्यावी लागली, ही वस्तुस्थिती भारतीय समाजाच्या इतिहासातील सर्वात वेदनादायी अध्यायांपैकी एक आहे. आज या सत्याग्रहाची आठवण करताना एक प्रश्न प्रत्येकाच्या मनात उभा राहतो की, मानवी स्वाभिमानासाठी लढलेली ती क्रांती आपण खरोखर समजून घेतली आहे का?

भारतीय समाजात शतकानुशतके अस्पृश्यतेची क्रूर परंपरा अस्तित्वात होती. समाजातील काही घटकांना मंदिरात प्रवेश नव्हता, शाळेत बसण्याचा अधिकार नव्हता, सार्वजनिक रस्त्यांवर चालण्यासही बंदी होती. इतकेच नव्हे तर पाणी पिण्याचाही अधिकार नाकारला गेला होता. गावातील विहिरी, तळी आणि पाणवठे हे तथाकथित उच्चवर्णीयांच्या मालकीचे मानले जात. अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाला पाण्याच्या एका घोटासाठीही अपमान सहन करावा लागत होता. ही केवळ सामाजिक विषमता नव्हती; ती मानवतेच्या विरोधातील अन्यायाची पराकाष्ठा होती. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील महाड हे छोटेसे शहर भारतीय सामाजिक क्रांतीचे ऐतिहासिक केंद्र बनले. येथील चवदार तळे हे सार्वजनिक पाणवठे होते. महाड नगरपालिकेने १९२४ मध्ये ठराव करून हे तळे सर्वांसाठी खुले असल्याचे जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात दलित समाजाला त्या पाण्याचा वापर करण्याची परवानगी नव्हती. कागदावर अधिकार होता; पण वास्तवात अपमान आणि बंदी होती. याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या अन्यायाला थेट आव्हान देण्याचा निर्णय घेतला. त्यांना ठाऊक होते की हा संघर्ष केवळ पाण्यासाठी नाही; हा संघर्ष आहे मानवी समानतेसाठी.



१९ मार्च १९२७ रोजी महाड येथे हजारो दलित बांधव एकत्र जमले. दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लोकांनी चवदार तळ्याकडे मोर्चा काढला. इतिहासातील तो क्षण खरोखरच अद्वितीय होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचे पाणी हातात घेतले आणि ते प्राशन केले. तो केवळ पाण्याचा घोट नव्हता; तो होता मानवी स्वाभिमानाचा उद्घोष. त्या क्षणी हजारो वर्षांची भीती, गुलामी आणि अपमान यांना पहिल्यांदाच थेट आव्हान दिले गेले. हजारो लोकांनी त्या तळ्याचे पाणी पिऊन आपल्या समानतेचा अधिकार घोषित केला. परंतु या घटनेनंतर समाजातील सनातनी शक्तींनी या आंदोलनाचे स्वागत केले नाही. उलट प्रचंड विरोध झाला. अनेक ठिकाणी दलितांवर हल्ले झाले. चवदार तळे तथाकथित "शुद्ध" करण्यासाठी त्यात गंगाजल टाकण्याचे प्रकारही घडले. ही घटना दाखवून देते की समानतेचा संघर्ष किती कठीण आणि वेदनादायी होता. तरीही हा संघर्ष थांबला नाही. चवदार तळे सत्याग्रहाने भारतीय समाजात एक नवा विचार रुजवला. मानव हा मानवच आहे; त्याला पाणी, हवा आणि जीवनावर समान अधिकार आहे. हा विचार पुढे जाऊन भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांमध्ये प्रतिबिंबित झाला.

चवदार तळे सत्याग्रह हा दलित चळवळीच्या इतिहासातील पहिला मोठा सार्वजनिक आंदोलन मानला जातो. याच संघर्षाने पुढील अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा दिली. तो केवळ एका तळ्याचा प्रश्न नव्हता; तो होता मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न. आज भारतात संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले आहेत. परंतु सामाजिक विषमता अजूनही पूर्णपणे संपलेली नाही. अनेक ठिकाणी जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार आणि अन्याय आजही दिसतो. अशा वेळी चवदार तळे सत्याग्रहाची आठवण आपल्याला जागृत करते. कारण हा संघर्ष आपल्याला सांगतो, अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. आजच्या पिढीने चवदार तळे सत्याग्रह केवळ इतिहास म्हणून वाचू नये. तो समानतेचा आणि मानवतेचा धडा म्हणून समजून घ्यायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेला मार्ग म्हणजे संघर्ष, संघटन आणि जागृतीचा मार्ग आहे. तो मार्ग आजही तितकाच महत्त्वाचा आहे.


चवदार तळे सत्याग्रह हा केवळ एका तळ्याच्या पाण्यासाठी लढलेला संघर्ष नव्हता; तर तो होता मानवतेच्या स्वाभिमानाचा महासंग्राम. आज आपण सहजपणे पाण्याचा घोट घेतो; परंतु त्या एका घोटामागे हजारो लोकांचा संघर्ष, अपमान आणि त्याग दडलेला आहे. म्हणूनच चवदार तळे सत्याग्रह हा भारतीय सामाजिक इतिहासातील समतेचा दीपस्तंभ आहे. आज या ऐतिहासिक संघर्षाचे स्मरण करताना आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा. आपण खरोखर समतेचा समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहोत का? कारण पाण्याच्या एका घोटासाठी लढलेली ती क्रांती आजही आपल्याला सांगते, मानवतेपेक्षा मोठे कोणतेही धर्म, जात किंवा परंपरा असू शकत नाही. चवदार तळे सत्याग्रहाच्या स्मृतिदिनानिमित्त सर्वांना समता, स्वाभिमान आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!



प्रवीण बागडे

# उन्हाळ्यात त्वचेची काळजी घेण्यासाठी करा 'हे' उपाय

सध्या सुरु असलेल्या उन्हाळ्याने लोकांना हैराण केले आहे. उष्णता इतकी तीव्र आहे की, सूर्य आगच ओकत असल्याचाच भास होत आहे. मार्चमध्येच हे हाल आहे तर एप्रिल आणि मे महिना काय असेल याचा अंदाज लावायला देखील लोकांना धडकी भरत आहे. लोकांना आता ही गरमी सहन होत नाही. या उन्हामुळे लोकांच्या तब्येतीवर देखील परिणाम होण्यास सुरुवात झाली आहे. अनेकांना या उन्हामुळे विविध त्रास होत आहे. पण उन्हाचा सर्वात जास्त परिणाम हा आपल्या त्वचेवर होत आहे. उन्हामुळे त्वचेचे मोठे नुकसान होत असून, ती काळी पडत आहे. या काळवंडणाऱ्या त्वचेसाठी बाहेरचे अनेक उपाय केले जात आहे. मात्र बाहेरच्या उपायांपेक्षा घरी साधे, सोपे आणि अपेक्षित परिणाम देणारे उपाय करता येत असतील तर? तर का बाहेरचे खर्चिक आणि केमिकल्स असलेले प्रोडक्ट वापरून त्वचा अधिक खराब करून घ्यायची? उन्हामुळे त्वचा खराब होऊ नये यासाठी घरगुती कोणते उपाय करता येतील चला जाणून घेऊया.



**लिंबाचा रस आणि मध**

लिंबामध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, जे त्वचेवरील टॅन दूर करण्यास मदत करतात. मध त्वचेला मॉइश्चरायझ करतो आणि चमकदार बनवतो. लिंबाचा रस आणि मध समप्रमाणात मिसळून त्वचेवर लावा. १५-२० मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. आठवड्यातून दोन वेळा हा उपाय केल्यास त्वचा स्वच्छ आणि उजळ दिसेल.

**सनस्क्रीन**

सूर्याच्या प्रखर यूव्ही किरणांपासून वाचण्यासाठी सनस्क्रीनचा वापर करता येतो. अशा वेळी एसपीएफ ३० पेक्षा अधिक सनस्क्रीन वापरले पाहिजे. हे सूर्याच्या अतिनील किरणांपासून संरक्षण करते, परंतु त्वचा अधिक संवेदनशील असेल तर एसपीएफ ३० पेक्षा कमी वापरावे. चेहरा टॅनिंगपासून वाचवायचा असेल तर चेहऱ्यावर मास्क लावून मग उन्हात जावे. असे असले तरी जर पुरेसे ऊन मिळाले नाही तर शरीरात व्हिटॅमिन डी ची कमतरता निर्माण होऊ शकते.

**बटाट्याचा रस**

बटाट्यामध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, जे टॅनिंग दूर करण्यास मदत करतात. बटाट्याचा रस काढून त्वचेवर लावा आणि १५-२० मिनिटे ठेवा. त्यानंतर कोमट पाण्याने धुवा. हा उपाय नियमित केल्यास त्वचा उजळ आणि टॅन फ्री दिसेल.

**टोमॅटो आणि दुध पॅक**

टोमॅटोमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे टॅन दूर करण्यात मदत करतात, तर दूध त्वचेला पोषण देते. टोमॅटोचा रस आणि कच्चे दूध समप्रमाणात मिसळा आणि टॅन झालेल्या भागावर लावा. २० मिनिटांनी धुवा. यामुळे त्वचेचा रंग सुधारेल आणि टॅनिंग लवकर कमी होईल.

**हळद आणि चंदन**

हळद आणि चंदन लावल्याने आपली त्वचा थंड आणि मऊ राहते. ज्यामुळे आपल्या त्वचेला उन्हाळ्याच्या उष्णतेपासून खूप आराम मिळतो. थेट त्वचेवर पडणाऱ्या प्रकाशामुळे देखील आराम मिळतो.

**दही आणि बेसनचा स्क्रब**

दहीमध्ये लॅक्टिक ॲसिड असते, जे त्वचेतील मृत पेशी काढून टाकण्यास मदत करते, तर बेसन त्वचेला उजळ बनवते. दोन चमचे दही आणि एक चमचा बेसन मिसळून पेस्ट तयार करा. ही पेस्ट चेहरा आणि हातांवर लावा आणि हलक्या हाताने मसाज करा. १५ मिनिटांनी पाण्याने धुवा. हा उपाय आठवड्यातून तीन वेळा करा.

**लक्षात ठेवा**


उन्हाळ्यात उन्हापासून वाचण्यासाठी व डिहायड्रेशन होऊ नये यासाठी पुरेसे पाणी प्यावे. दिवसभरात कमीत कमी ७ ते ८ ग्लास पाणी प्यायले पाहिजे. तसेच थंडावा मिळावा म्हणून आपण वारंवार चेहरा धुतो. परंतु बोअरवेलमधून सोडले जाणारे पाणी, त्वचेसाठी थोडे कठोर असते. या पाण्यामुळे केवळ कोरडेपणा सारख्या समस्याच उद्भवत नाहीत तर त्वचेची चमकही कमी होऊ शकते. म्हणूनच तुमच्या त्वचेनुसार योग्य पाण्याचा वापर करणे महत्त्वाचे आहे.

आपल्या शरीराचे काही भाग असे आहेत जे उघडे राहतात आणि या ते सूर्याच्या अधिक संपर्कात येतात. अशावेळी शरीराचे हे भाग सनस्क्रीनने झाकले जाऊ शकतात. याशिवाय डोळ्यांसाठी काळा गॉगल वापरता येतो. तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार योग्य सनस्क्रीन निवडण्यासाठी त्वचा तज्ज्ञांचा सल्ला घ्या. उन्हाळ्यात त्वचा निरोगी ठेवण्यासाठी काही गोष्टींची काळजी घेणेही गरजेचे आहे. उन्हाळ्यात शरीराला पाण्याचा पुरवठा होईल असा आहार घ्या. त्वचा निरोगी ठेवण्यासाठी विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसात भरपूर फळे आणि भाज्या आणि त्यांचे ज्यूस यांचा आहारात समावेश करावा.

**ऊसाचा रस**

जर तुम्हाला उन्हात काही कामासाठी घराबाहेर जावे लागत असेल तर तुमचं शरीर संपूर्ण झाकणारे कपडे घाला. शरीराच्या कोणत्याही भागाला थेट ऊन लागणार नाही याची काळजी घ्या. पूर्ण बाह्यांचे शर्ट, कुर्ते, फुल पॅन्ट्स किंवा सलवार घाला. तसेच डोळ्यांना गॉगल लावा

# चुकीच्या सवयींमुळे आरोग्यावर होऊ शकतो विपरीत परिणाम;सकाळी पाणी पिण्याचे नियम पाळा



**पाणी हे जीवनासाठी अत्यावश्यक असले तरी ते योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने न पिल्यास आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतात, असे आयुर्वेदतज्ज्ञ सांगतात. अनेकांना सकाळी उठल्याबरोबर पाणी पिण्याची सवय असते; मात्र ते कसे आणि किती प्यावे, याबाबत जागरूकता कमी दिसून येते.**

आयुर्वेदात सकाळी रिकाम्या पोटी पाणी पिण्याच्या प्रक्रियेला 'उषापान' असे म्हटले जाते. ब्रह्ममुहूर्तावर, म्हणजे सूर्योदयापूर्वी पाणी पिणे शरीरासाठी लाभदायक मानले गेले आहे. तज्ज्ञांच्या मते, उठल्यानंतर तोंड न धुता १ ते २ ग्लास पाणी हळूहळू पिण्याने पचनसंस्था सक्रिय होते. काही जण हळूहळू प्रमाण वाढवत एक लिटरपर्यंत पाणी पितात.

**थंड पाण्यापासून सावध**

सकाळच्या वेळी फ्रिजमधील थंड पाणी पिणे टाळावे, असे आयुर्वेद सांगतो. कोमट पाणी पिल्याने आतड्यांची हालचाल सुधारते, शरीरातील साचलेले द्रव्य बाहेर पडण्यास मदत होते आणि चयापचय क्रिया वेगवान होते. त्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यासही मदत होऊ शकते.

**तांब्याच्या भांड्यातील पाण्याचे महत्त्व-**

रात्रभर तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी सकाळी पिणे आरोग्यासाठी उपयुक्त मानले जाते. तांब्यातील सूक्ष्म गुणधर्म पाणी शुद्ध ठेवण्यास सहाय्य करतात, असे पारंपरिक मानले जाते. यामुळे शरीरातील वात, पित्त आणि कफ यांचे संतुलन राखण्यास मदत होते, असा आयुर्वेदीय दावा आहे.

**उभे राहून पाणी पिणे टाळा**

घाईगडबडीत उभे राहून किंवा एकदम मोठ्या घोटांनी पाणी पिण्याची सवय अनेकांना असते. मात्र तज्ज्ञांच्या मते, पाणी नेहमी बसून आणि हळूहळू घोट घेत पिणे योग्य ठरते. यामुळे लाळ पाण्यात मिसळून पचनक्रियेला मदत होते आणि आम्लपित्ताचा त्रास कमी होऊ शकतो.

**जेवणानंतर लगेच पाणी नको**

जेवण झाल्यानंतर त्वरित जास्त प्रमाणात पाणी पिणे टाळावे. जेवण आणि पाणी यामध्ये किमान ३० ते ४५ मिनिटांचे अंतर ठेवणे हितावह असल्याचे आयुर्वेदात नमूद आहे. अन्यथा पचनसंस्थेवर ताण येऊ शकतो.

आरोग्य चांगले राखण्यासाठी केवळ पाणी पिणे पुरेसे नाही, तर ते योग्य वेळी आणि योग्य प्रकारे पिणे तितकेच महत्त्वाचे आहे.

साध्या सवयींमध्ये बदल करून निरोगी जीवनशैलीकडे वाटचाल करता येऊ शकते.

# ठाणे–मुलुंड दरम्यानच्या स्थानकास 'आनंद दिघे' यांचे नाव देण्यास ठाणे महानगरपालिकेची मंजुरी ; सर्वसाधारण सभेत अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर

**ठाणे :** मध्य रेल्वेच्या ठाणे–मुलुंड दरम्यान उभारण्यात येणाऱ्या नव्या रेल्वे स्थानकाला 'आनंद दिघे' यांचे नाव देण्याबाबतचा अभिनंदनाचा ठराव बुधवारी झालेल्या ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. ठाणे–मुलुंड दरम्यान वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर नवीन स्थानक उभारण्याचा निर्णय मध्य रेल्वेकडून घेण्यात आला आहे. या स्थानकासाठी येणाऱ्या संपूर्ण खर्च रेल्वे करणार असून या नव्या स्थानकामुळे ठाणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी होऊन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. नवीन ठाणे स्थानकासाठी 250 कोटींच्या वर खर्च येणार होता. स्मार्टसिटी बरोबर जो करार झाला होता त्यामध्ये सदरचा खर्च ठाणे महानगरपालिका आणि काम रेल्वे करणार असे ठरले होते, परंतु या कामाच्या मंजुरीला विलंब लागल्याने हा खर्च वाढला होता, यासाठी रेल्वे सातत्याने खर्चाची मागणी करत होते. यावर खासदार श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के यांनी रेल्वेमंत्र्यांना भेटून सदरचा खर्च रेल्वेने करावा याबाबत पाठपुरावा केला. कोविडनंतर ठाणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट झाल्याने हा खर्च रेल्वेने करावा अशी सातत्याची मागणी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली, याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील रेल्वे मंत्र्यांशी चर्चा केली. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या संदर्भात अनेक बैठका दिल्लीमध्ये घेतल्या तसेच खासदार श्रीकांत शिंदे व नरेश म्हस्के यांनी देखील वारंवार संसदेत ही मागणी केली, यानंतर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा खर्च रेल्वे करेल असे मान्य केले, याबाबत त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बोलवून देखील ही बाब सांगितली व तसा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे मंजुरीसाठी सादर केला असल्याचे सांगितले.

याबाबत खासदार श्रीकांत शिंदे व नरेश म्हस्के तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील रेल्वे मंत्र्यांकडे पाठपुरावा करून ठाणे महानगरपालिकेवरील आर्थिक बोजा कमी केला, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के यांच्या अभिनंदनाचा ठराव बुधवारी झालेल्या महासभेत मांडण्यात आला व तो एकमताने मंजूर करण्यात आला.या नवीन रेल्वे स्थानकाला धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव द्यावे अशी मागणी नरेश म्हस्के यांनी संसदेच्या सभागृहात केली, याबाबत ठराव महासभेत मांडण्यात आला आणि तो मंजूर करण्यात आला.

आनंद दिघे यांनी ठाणे शहराच्या सामाजिक, राजकीय आणि विकासात्मक क्षेत्रात केलेले योगदान लक्षात घेता, त्यांच्या नावाने स्थानकाचे नामकरण करणे ही ठाणेकरांसाठी अभिमानाची बाब असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या निर्णयामुळे ठाणे–मुलुंड परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, नवीन स्थानकामुळे वाहतूक व्यवस्था अधिक सुकर होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.